समान प्रेम करण्याची प्रवृत्ती फक्त हिंदु धर्मानेच जोपासलेली दिसते.

मानवी जीवनाच्या आचरण उपक्रमात निश्चित तथा योग्य मूल्यांवर श्रद्धा नसेल तर आचरित विधी निरस आणि यांत्रिक ठरत असतात. अशा यांत्रिकतेचे उच्चाटन करण्यासाठी आणि जीवनाचे सत्यदर्शन करण्यासाठी सनातन हिंदु धर्माने सहिष्णु वृत्तीवर भर दिलेला आहे. सर्वांभूती एकच आत्मा विद्यमान असतो या सहिष्णु आचरणास हिंदुतत्त्व किंवा हिंदुत्व असे म्हणतात. म्हणजे हिंदुत्वाची संकल्पना संकुचित मनोवृत्तीची नसून सार्वभौलिक, सार्वदेशिक, आणि सार्वकालिक तत्त्वांचा उद्घोष करणारी आहे. धर्म या शब्दाचा पंथनिरपेक्ष अर्थ हिंदु धर्मातच जोपासला गेलेला दिसतो.

वस्तुत: सनातन हिंदु धर्म ऐहिक अभ्युदय आणि शाश्वत कल्याण या दोन्ही गोष्टींच्या समान साध्यावर जोर देतो. ऐहिक उत्कर्ष साधायचा असेल तर समाजाच्या ऋणाचा विचार करावयास पाहिजे. कारण समाजाच्या ऋणातूनच जन्माचा मार्ग निर्वेध आणि वैध झालेला असतो. जन्मत:च प्रत्येक मनुष्य तीन ऋणं घेवून जन्माला येतो. -- असे 'तैतिरिय ब्राह्मण ग्रंथात' सांगितले आहे. ही ऋणं अनुक्रमे -- ऋषिऋण, पितृऋण आणि समाजऋण अशी आहेत. ऋषिऋण ज्ञानसाधना करून, पितृऋण प्रजोत्पत्ती करून आणि समाजऋण समाजात एकवाक्यता करून फेडता येते. यात समाजाची बांधिलकी मानलेली आहे. कारण ही ऋणं फेडल्यावाचून स्वत:च्या सुखाची किंवा पारलौकिक कल्याणाची इच्छा करणारी व्यक्ती अध:पतीत होत असते, असे धर्मशास्त्रकार सांगतात. सनातन धर्माच्या परंपरेत मोक्षाला महत्त्व आहे, परंतु ही ऋणं फेडल्याशिवाय मोक्षप्राप्ती नाही असे मनूने ठासून सांगितले आहे. एवढेच नव्हे तर, तैतिरीय ब्राह्मण आणि महाभारत या दोन ग्रंथांत मानवऋण नावाचे चौथे ऋण सांगितलेले आहे! प्रत्येक व्यक्तीने सर्वांशी दयाळूपणे वागून हे ऋण फेडले पाहिजे, असेही स्पष्ट केलेले आहे.

समाजात वावरणारी कोणतीही व्यक्ती दोन तऱ्हेंच्या शक्तींनी नियंत्रित असते. यापैकी एकाचा संबंध, जन्मकाली अनुवंशाच्या नियमांनी प्राप्त झालेल्या गुण-दोषांशी असतो, आणि दुसऱ्याचा संबंध जन्मोत्तर परिस्थितीप्रणित संस्कारांशी असतो! यापैकी अनुवंश तत्त्व प्रधान मानून केलेल्या मानवांच्या विभागाला किंवा गणविभागास सनातन धर्मशास्त्रानं 'जाती' ही संज्ञा दिली आणि संस्कारतत्त्व प्रधान मानून केलेल्या गणविभागास 'वर्ण' ही संज्ञा दिली. उत्कृष्ट अनुवंश गट (नेचर) आणि उत्कृष्ट संस्कारगट (नर्चर) यांच्या समुच्चयाने उत्कृष्ट जाती म्हणजे मानवसमूह निर्माण होतो! हाच विचार व्यक्त करताना 'वसिष्ठ स्मृती'त -- **'चातुर्वर्ण्यम् प्रकृतिविशेषात संस्कारवशात।'** असे सांगितले आहे.

तथापि कोणत्याही समाजनियंत्याला ज्यांची व्यवस्था करावयाची त्या सामाजिक घटकांची नैसर्गिक शक्ती (कंपोझिशन) काय स्वरूपाची आहे आणि त्या घटकांची कशाप्रकारे रचना करावयाची (कॉन्स्टिटयुशन) याचा प्रथम विचार करावा लागतो. नुसते घटक श्रेष्ठ असून ज्याप्रमाणे चालत नाही; त्याचप्रमाणे घटकांच्या नैसर्गिक लायकीकडेही दुर्लक्ष करून चालत नाही! आयुष्यमान जीवनात 'जीवनार्थ' होणारा कलह हा व्यक्तीव्यक्तीत नसून अनुवंशिक गटात म्हणजेच जातीत असतो! हे स्पष्ट जाणवल्यामुळे सनातन हिंदुतत्त्ववेत्त्यांनी विवाहाच्या नियंत्रणाने नियमित गटांना समाजस्वास्थ्याचे आद्य घटक मानले. या पद्धतीत व्यक्तीला जातीचे सर्व हक्क आणि कर्तव्ये आपोआप प्राप्त होतात. परंतु गटांतर्गत एका व्यक्तीला अन्य जातीचे हक्क उपभोगता येत नाहीत किंवा त्यांची कर्तव्येही करता येत नाहीत. आर्थिक स्पर्धा नष्ट करण्यासाठी समाज, उद्योगांनीयुक्त आणि नियंत्रित अशा जातीसंस्थेवर उभारावाच लागतो. यामुळे जाती हा आद्यघटक ठरतो. अशातऱ्हेने सांस्कृतिक व्यवस्थेचा प्रश्न सोडविण्यासाठी प्राचीन हिंदु समाजवेत्त्यांनी वर्णव्यवस्था उत्पन्न केली. ही व्यवस्था प्रस्थापित करताना त्यांनी मानवाच्या नैसर्गिक शक्तीची मर्यादा (व्हर्टिकल डिव्हीजन) लक्षात घेतलेली होती.

कायद्याच्या दृष्टीने 'ऑल मेन आर इक्वल' हे जरी खरे असले तरी अनुवंश आणि संस्कार या दोन्हींचा विचार केला असता सर्वांच्या शक्ती सारख्या कधीच नसतात. कारण ज्ञानलालसा, अधिकाराची आकांक्षा, द्रव्येषणा, आणि कोणत्याही तऱ्हेची लालसा प्राधान्याने प्रतीत न होणे या चार मानवी मनाच्या मूलभूत प्रवृत्ती आहेत! त्यापैकी ज्ञानपिपासू व्यक्ती इतर इच्छांना गौण मानेल परंतु त्या व्यक्तीलाही स्वत:चा अभ्युदय करून घ्यायचा असेल तर इच्छांचे सर्वथा निर्मूलन करता येणार नाही. अधिकार गाजवायचा असेल तर ध्येयाचे साधन म्हणून ज्ञान आणि संपत्ती यांची आवश्यकता नाहीशी होत नाही! म्हणून प्रत्येकाच्या ध्येयाला पोषक असे शिक्षण आणि संस्कार देणे आवश्यक असते. ऐतिहासिक काळात कित्येक अंत्यज जाती स्पृश्य झाल्या आणि कित्येक श्रेष्ठ जाती अधोगतीला गेल्या -- असे मनूच्या, **"शनकैस्तू क्रियालोप पादिया: क्षत्रिय जातय: वृषलत्वमगतालोके ब्राह्मणा-दर्शनेनच।"** (मनुस्मृती: ६/४३) या श्लोकात आचार्य मनूने सर्वच जातींचा क्रियालोप किंवा वर्णलोप होतो असे सांगितले आहे. वर्णात उच्चगामित्त्व किंवा अधोगामित्त्वही होत असते. गटांचे उत्कर्ष आणि अपकर्षही होत असतात; व्यक्तींचे होत नसतात. संस्कृतीचा विचार करताना बुद्धी आणि भावनांचाही विचार करावयाचा असतो. संपूर्ण गटाची बुद्धिमुक्त सद्भावनाप्रधान संस्कृती वाढणेच नव्हे तर वाढविणेही आवश्यक असते. कारण सामाजिक कार्याच्या जोरावर सांस्कृतिक उंची वाढवता येते; नुसते कायदे करून ती वाढत नसते. हिंदु समाजातल्या जाती साचेबंद नाहीत. वर्णातील व्यक्तींनी धर्म म्हणजे व्यवसाय बदलला तरी जातींचे आचार पूर्णपणे बदलत नाहीत!

**'आचार प्रभवो धर्म:।'** -- असे हिंदुधर्मशास्त्र सांगते.

हिंदु-समाजाचा निश्चित आकार असलेला तथापि एकमेकात न मिसळलेला घटक म्हणजे जात आहे. उच्च न्यायालयाने अनेक वेळा जात हासुद्धा एक वर्ग आहे हे विसरून चालणार नाही; असे नमूद केले आहे!

**-- अरूण ताम्हणकर**

# रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान

(मागील अंकावरून पुढे चालू)

मूळ लेखक– कै. बी. व्ही. नरसिंहस्वामी, मद्रास.
मराठी भाषांतर– श्री. शं. बा. पटवर्धन, मुंबई.

बाबांचे माझ्यावरील प्रेम इतके गाढ होते की त्याची परतफेड करायची म्हणजे नुसते कृतज्ञतेचे अश्रू ढाळणे एवढेच मी करू शकत होतो. हंडी उकळत असतानासुद्धा ढवळण्यासाठी पळी, झारा नव्हता. बाबा आत हात घालून ढवळत होते ते पाहून मी थक्क झालो. त्यांच्या हाताला भाजल्याची यत्किंचितही खूण नव्हती. मग एकदम ते आम्हा तिघांना लेंडीवर घेऊन गेले. खरे म्हणजे ती वेळ लेंडीवर जाण्याची नव्हती. तेथे गेल्यावर त्यांनी स्वहस्ते लहान-लहान खड्डे खणले व माझ्या हाती दाणे देऊन ते त्यात पेरण्यास सांगितले. दाणे टाकल्यावर पुन्हा माती टाकून त्यांनी मला पाणी घालायला सांगितले. एवढे सर्व करून आम्ही मशिदीत परतलो. त्यानंतर ७/८ वर्षांनी (बाबांच्या समाधीनंतर) हीच लेंडीबाग मी विकत घेतली. याप्रमाणे आठ दिवस आम्हाला ठेवून घेऊन बाबांनी आम्हाला जाण्याची परवानगी दिली. त्यावेळेला बाबू चांदोरकराने बाबांच्या पायाखाली एक थाळी ठेवून बाबांचे पाय धुतले आणि तेच पाणी तीर्थ म्हणून घरी नेण्यासाठी घेतले. तोपर्यंत फक्त उदीच बरोबर घेऊन जाण्याची परवानगी असे. पादतीर्थ आरतीनंतर लगेच तेथे संपत असे. पण मीही बाबूचे अनुकरण करून आई व इतरांकरिता तीर्थ घेतले.

मनमाडपासून मुंबईपर्यंत आमच्याकडे तिसऱ्या वर्गाची तिकीटे होती आणि या तिकिटांवर पंजाब-मेलमधून प्रवास करण्याची मनाई होती, पण आनंदाच्या भरात आम्ही पंजाब-मेलमध्ये घुसलो व मुंबईला ४/५ तास अगोदर येऊन पोहचलो. घरी पोहचताच कळले की माझ्या आईला अर्धांगाचा झटका आला होता. "माझ्या अंगाची एक बाजू फार दुखत आहे" असे बाबांनी शिरडीत उद्गार काढले त्याचवेळेला इकडे ही घटना घडली होती. डॉक्टरला बोलावून आणले होते व शिरडीत मला ही बातमी कळवावी असा बेत चालला होता. तेव्हा नानासाहेब चांदोरकर तेथे हजर होते. ते म्हणाले की जोपर्यंत मी बाबांजवळ शिरडीत आहे तोपर्यंत काळजीचे, काहीच कारण नाही. तशीच जरूरी वाटली तर बाबा स्वतःहून मला मुंबईस परत पाठवतील. आम्ही ज्यावेळेस शिरडी सोडली त्याचवेळेस इकडे डॉक्टरने आईस तपासून सांगितले की आतड्यांचे चलनवलन होत नसल्याने अस्वस्थपणा वाढला असून तब्येत सिरिअस आहे. आतड्यांचे चलनवलन जर सुरू झाले तर आशेला खूपच जागा आहे. त्याच पहाटे ४-३० वाजता मी पोहचलो. उदी व तीर्थ आईला दिले. ते घेतल्यावर तिला थोडी गुंगी आली व नंतर शौचासही झाले. सकाळी डॉक्टरने येऊन तपासल्यावर ते म्हणाले, प्रकृतीत खूपच सुधारणा आहे. त्यावेळी बाबांच्या २/४ दिवसात बरे होईल या उद्गाराची मला आठवण झाली. आई पूर्णपणे बरी होऊन नंतर चार वर्षे जगली. निधनापूर्वी २ वर्षे तिने शिरडीस जाऊन बाबांचे दर्शन घेतले. आमच्या सर्व कुटुंबियांनी बाबांच्या दर्शनाचा लाभ घेतला. माझी पत्नी व बहीण शिरडीस गेल्या तेव्हा माझ्या पत्नीला बाबांच्याकडून एक विशेष आशीर्वाद मिळाला. एके दिवशी माझ्या आईच्या घरी दासगणूंचे सुंदर कीर्तन झाले. ते संपल्यावर मी दासगणू, नानासाहेब चांदोरकर व इतर मित्रमंडळींना सांताक्रूझला आमच्या घरी विश्रांतीसाठी बोलाविले. ते कीर्तनाच्या संगीतसाथीसह आमच्याकडे आल्यावर एकाने विनंती केली की येथेपण कीर्तन व्हावे. रात्री २ पासून पहाटे ५ पर्यंत कीर्तन झाले. त्या ब्राह्ममुहूर्तावर झालेल्या कीर्तनाचा इतका परिणाम माझ्या पत्नीवर झाला की ताबडतोब शिरडीस जाण्याचा निश्चय तिने केला. त्यातच बाबांनी स्वप्नात दर्शन दिल्याचेपण तिने सांगितले. यामुळे तिला शिरडीस येण्याची परवानगी आहे हे उघड झाले. पण माझ्या मेहुणीचे काय? यावर मी विचार केला. माझी पत्नी व मेहुणी या दोघीही प्रसुतीवेदनांचा धोका पत्करण्यास तयार होत्या. मग मी १२ लोकांचे पैसे भरून एक स्पेशल सेकंड-क्लासचा डबा रिझर्व्ह केला. त्यातून आम्ही कोपरगावला उतरल्यावर तो तेथेच सायडिंगला ठेवण्याची व्यवस्था केली. आम्ही निघालो व कोपरगाव स्टेशन जवळ येऊ लागले तशी माझी पत्नी म्हणाली,

"कोपरगाव स्टेशनवर नानासाहेब चांदोरकर भेटले तर फार बरे होईल."

मी म्हटले,

"हे कसे शक्य आहे?"

पण जे अशक्य वाटले तेच झाले. प्रकृती बरी नसल्याने चांदोरकर शिरडीस गेले होते. त्यांना दिवसाआड ताप येत होता आणि आमचा तेथे पोहचण्याचा दिवस त्यांच्या तापाचा होता. तरीपण माझे पत्र मिळाल्यावरून ते बाबांकडे परवानगी मागण्यास गेले. बाबांनी ताबडतोब अनुमती दिली. त्यावेळी काकासाहेब बाबांना म्हणाले,

"बाबा, आज त्यांच्या तापाची पाळी आहे. त्यांच्याऐवजी मी जाणे बरे."

बाबांनी मात्र निक्षून सांगितले की

नानालाच गेले पाहिजे. त्याप्रमाणे नानासाहेब आले व त्यांनी आमचे शाही-स्वागत करून गोदास्नानाची उत्तम व्यवस्था केली. त्यानंतर आम्ही सर्वजण शिरडीस सुखरूप पोहचलो. या दगदगीचा नानासाहेबांना यत्किंचितही त्रास झाला नाही. उलट त्यांचा ताप निघाला तो पुन्हा आलाच नाही. तेथे गेल्यावर बाबांचे दर्शन घेऊन आम्ही सर्व बसलो असताना बाबा माझ्या पत्नीकडे बोट दाखवून माधवराव देशपांडे यांना म्हणाले,

''ही बघ माझ्या बाबूची आई.''

माझी मेहुणी गरोदर असल्याने तिला उद्देशून बाबांचे उद्‌गार असावेत असे वाटून नानासाहेबांनी त्यांना विचारले,

''बाबा हीच ना?'' (माझी मेहुणी)

बाबांनी पुन्हा माझ्या पत्नीकडे बोट दाखविले व म्हणाले,

''नाही. ती नाही ही.''

(रा. ब. साठे यांचे सासरे दादा केळकर यांचा बाबू हा पुतण्या होता. तो बाबांचा फार लाडका होता. बाबांनी दादासाहेब खापर्डे यांना बाबूच्या अनेक जन्मातल्या हकिकती सांगितल्या, त्या अशा: शिरडीला एक वृद्ध व धार्मिक निष्ठेचा गृहस्थ १२ वर्षे रहात होता. त्याची पत्नी व मुले जालन्यास रहात होती व ते सारखे याला जालन्यास येण्याबद्दल आग्रह करीत होते. शेवटी घोड्यावर बसून तो निघाला व मी त्याच्याबरोबर बैलगाडीतून निघालो. काही काळाने या वृद्ध गृहस्थाने आपल्या भावाच्या तरुण मुलीबरोबर लग्न केले व त्याला एक मुलगा झाला. तो ६ वर्षाचा असताना त्याचे वडील वारले. पुढे या मुलावर नातेवाईकांनी विषप्रयोग करून त्याला मारले. त्याच मुलाचा पुढील जन्म म्हणजे बाबू व या बाबूचा पुढील जन्म मुंबईत होणार आहे.) या तारखेनंतर बरोबर एका वर्षाने मला मुलगा झाला व आम्ही त्याचे नाव बाबू ठेवले. बारशाच्या समारंभास दासगणू, नानासाहेब चांदोरकर वगैरे मंडळी उपस्थित होती. बारसे थाटात केले. आम्ही सर्वांनी बाबांच्या कृपाळूपणाचे स्मरण करीत समारंभाची सांगता केली. शिरडीस पहिल्यावेळी गेलो तेव्हा मशिदीत बाबांसमोर बसलो असताना मेघगर्जना व वादळासहित मुसळधार पाऊस सुरू झाला. माझ्या मनात विचार आला की अशाच जोराचा पाऊस पडत राहिला तर ओढे, नाले यांना पूर येऊन माझे मुंबईस जाणे थांबेल. बाबांनी लगेच आकाशाकडे पाहून म्हटले,

''अरे अल्ला, अब बरसात पुरी कर! मेरे बालबच्चे घर जाने वाले हैं! उनको सुख से जाने दो!''

तत्क्षणीच पावसाचा जोर ओसरला व बाबांची रजा, उदी व तीर्थ घेऊन निघालो ते मनमाडला पंजाब-मेल गाठून मुंबईस पोहचलो. दुसऱ्या रात्री माझ्या मेहुणीने बाबांसारखा दिसणारा फकीर स्वप्नात पाहिला. यावरून मी खूणगाठ बांधली की बाबांचा वास आमच्या घरात आहे.

**१९-१०-१९३६**

मी पुन्हा सांगतो की बाबांची आमच्या कुटुंबावर फार मोठी कृपा होती. बाबूचा जन्म झाल्यावर माझ्या पत्नीने बाबांना घरातल्या देवासमान मानायचे ठरविले. आमच्या लोकात अशी पद्धत आहे की स्त्री बाळंत होऊन जेव्हा आपल्या पतीच्या घरी जाते तेव्हा तिने आपल्या ओटीत गहू, नारळ, फळे वगैरे घेऊन ती आपल्या सासऱ्यास किंवा घरातील देवांना द्यावयाची. बाबू चार महिन्याचा झाल्यावर माझ्या पत्नीने अशी ओटी बांधून घेतली व शिरडीस गेल्यावर बाबांना अर्पण केली. बाबांनी आनंदाने ती एका ताटात घेतली व बाबूला कवटाळून ते म्हणाले,

''बाबू, कोठे गेला होतास? माझा कंटाळा आला होता काय?''

नंतर बाबांनी खिशातून दोन रुपये काढून बर्फी आणावयास सांगून सर्व मंडळींस ती वाटली. ही घटना १९१२ सालची. याचवेळी बाबा एका भिंतीकडे बोट दाखवून म्हणाले,

''जो कोणी ही भिंत कमानीसकट बांधून काढील त्याला परमेश्वर आशीर्वाद देईल.''

माझ्या पत्नीने ती बांधण्याची परवानगी मागितल्यावर तिला मिळाली. मग मी त्या खर्चासाठी ६०० रु. नानासाहेब चांदोरकर यांना दिले. नंतर बाबा पुन्हा म्हणाले,

''बाबूचा सुंदर बंगला तयार आहे.''

मी याचा अर्थ असा केला की सद्या रहात असलेला बंगला मी विकत घ्यावा अशी बाबांची इच्छा आहे. त्याप्रमाणे ६ महिन्यांतच मी हा बंगला विकत घेतला आणि १९१३ साली बाबूला सुंदर बंगला मिळाला. बाबूच्या पहिल्या वाढदिवसासाठी त्याला जेव्हा शिरडीला नेले तेव्हा बाबांनी पुन्हा दोन रुपयांची बर्फी वाटली व बाबूकडे पाहून ते म्हणाले,

''याला कोणी बहीण, भाऊ नाहीत का?''

माझ्या पत्नीने लाजून उत्तर दिले,

''बाबा, तुम्ही आम्हाला हा बाबूच दिला.''

नंतर बाबांच्या आशीर्वादाने आम्हाला आणखी एक मुलगा व मुलगी झाली. बाबूचा पहिला वाढदिवस साजरा करण्यासाठी माधवराव देशपांड्यांच्या घरी एक भोजन-समारंभ आयोजित केला होता. सर्व भक्तांना आमंत्रण दिले होते. तो दिवस गुरुवार होता. त्यादिवशी बाबासाहेब भाटे गुरुवारच्या उपासाचे कारण सांगून भोजनास आले नाहीत. ते बाबांकडे गेले असताना बाबांनी विचारले,

''भाऊकडे जेवायला गेला होतास का?''

**भाटे:** बाबा, आज गुरुवार आहे.

**बाबा:** म्हणून काय झाले?

**भाटे:** पण गुरुवारी परान्न घ्यायचे नाही असा माझा नेम आहे.

**बाबा:** कोणास प्रसन्न करण्यासाठी तू हा नियम पाळतोस?

**भाटे:** तुम्हास प्रसन्न करण्यासाठी.

**बाबा:** मग तुला मी सांगतो, भाऊकडे जाऊन जेव.

त्यावेळी सायंकाळचे ४ वाजले होते. बाळासाहेब माझ्याकडे येऊन त्यांनी बाबांची आज्ञा मला सांगितली. मग आम्ही सर्व बरोबर जेवलो.

एकदा सांताक्रूझला आमच्या घरी पत्नीने स्वप्नात बाबा तिच्याकडून पाद्यपूजा करवून घेत आहेत असे दिसले. नानासाहेब चांदोरकरांनी याचे विवरण असे केले की बाबांनी माझ्या पत्नीस घरात नित्य पाद्यपूजा करण्यास आज्ञा केली असून बरोबर दोन चांदीच्या पादुका शिरडीस नेण्यास त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे तिने केले. ती दर्शनास गेली तेव्हा दुमडलेले पाय बाबांनी सरळ करून ते तिला म्हणाले,

''पादुका या पायावर ठेवून पूजा कर.''

त्याप्रमाणे दोन पादुका दोन पायावर ठेवून तिने पूजा केली. तेव्हा बाबा चांदोरकरांना म्हणाले,

''नाना, हिने माझे पाय कापून नेले.''

दोन्ही पादुका स्वत:च्या हाताने उचलून तिच्या स्वाधीन केल्या. तेव्हापासून आजमितीपर्यंत ती या पादुकांचे पूजन करीत आहे. शिरडीत प्रथम आल्या दिवसापासूनच माझे भोजन बाबांच्याबरोबर मशिदीतच होत असे. नैवेद्याचे आलेले सर्व अन्न बाबा एकवटून आमच्या ताटात व वाटीत भरभरून टाकीत. अशा अन्नाची नासधूस होऊ नये म्हणून मी माझ्या पुतणीला बोलावून ताटातल्या पाऊण हिश्श्यापेक्षा जास्त तिला घेऊन जाण्यास सांगत असे. जे काय थोडे माझ्या वाटणीस येई त्याने पोट भरून जात असे.

॥ यस्यानुग्रहमिच्छामि तस्य वित्तम् हराम्यहम् ॥ या वचनाप्रमाणे बाबा ज्यावर कृपा करीत त्याच्या सर्व वित्ताचे हरण करीत. याप्रमाणे शिरडीहून परत निघताना असे सर्व पैसे संपून शिवाय मला १२०० रुपयांचे कर्ज झाले. मग तेथील एका गुरांच्या डॉक्टरकडून मी पैसे घेऊन ते फेडले व मुंबईस आल्यावर डॉक्टरला पैसे पाठविले.

याच्या थोड्या समयापूर्वी एक घटना घडली ती सांगतो. बाबू ३/४ वर्षाचा असताना खूपच आजारी झाला. त्यावेळी आमच्या घरी माधव भट नावाचा तेलंगी ब्राह्मण पूजा-अर्चा व जप-जाप्य यासाठी ठेवला होता. त्याला बाबूचा आजार बघून फार काळजी वाटू लागली. आम्ही साईबाबांची (मुसलमान?) आराधना करतो हे त्याला अजिबात पसंत नव्हते. किंबहुना मुसलमानाची पूजा केल्यानेच बाबू आजारी पडला अशी त्याची धारणा होती. हे त्याचे विचार मात्र तो उघड करू शकत नव्हता. एके रात्री स्वप्नात त्याला एक आकृती दिसली, हातात एक दंडा घेऊन ती जिन्यावर सर्वात वरच्या पायरीवर बसली होती. ती त्याला म्हणाली,

''तू स्वत:ला कोण समजतोस? या घरचा मालक मी आहे.''

आमच्याकडे असलेल्या फोटोवरून माधव भटाने ते साईबाबा आहेत हे ओळखले होते. त्याची वाच्यता मात्र त्याने कुठेही केली नाही. मुलाच्या आरोग्यासाठी दत्ताची आराधना करावी असे त्याने सांगितले तेव्हा बाबा हेच दत्त आहेत असे आम्ही त्याला उत्तर दिले होते. थोड्या वेळाने बाबूची प्रकृती जास्त खालावली. माधव भटाला जास्तच काळजी वाटू लागली. एकदम बाबांच्या फोटोसमोर उभे राहून त्याने बाबांची प्रार्थना केली,

''आज सायंकाळी चार वाजेपर्यंत बाबूची प्रकृती त्याला माडीवरून खाली आणण्याइतपत सुधारली तर मी तुम्हास दत्तावतार मानीन.''

ही प्रार्थना करून थोडा वेळ गेल्यानंतर बाबू मला खाली न्या असे त्याच्या आईला म्हणू लागला. ही त्याच्या प्रकृतीची सुधारणा बघून बाबा दत्तावतारी असल्याची माधव भटाची खात्री झाली व त्याने १२० रु. शिरडीस पाठविले. माधव भटाला मुलगा नव्हता म्हणून त्याने प्रार्थना केली की बाबांच्या आशीर्वादाने मुलगा झाल्यास मी १०८ रुपये बाबांना पाठवीन. पुत्रजन्मानंतर बाबांना त्याने १०८ रुपये दिले आणि त्यावेळी मनोमन प्रार्थना केली की जर माझ्या यजमानांची महत्त्वाकांक्षा साध्य झाली तर मी तुम्हास १००८ रुपये देईन. मांधवराव बाबांना म्हणाले,

''माधव भटाने तुम्हाला मोठी दक्षिणा दिली.''

त्यावर बाबा एवढेच म्हणाले,

''अरे, ती काहीच नाही. आणखी फार मोठी दक्षिणा तो मला देणार आहे.''

बाबांनी माझ्या पत्नीस चार हिताच्या गोष्टी सांगितल्या.

(१) तुला कोणी दहा शब्द ऐकवले तर त्याला एका शब्दातच उत्तर दे! तेही उत्तर द्यावयाचे असेल तर!

(२) कोणी कोणाची बरोबरी करू नये.

बाबांच्या महासमाधीच्या अगोदर मी ३२ दिवस शिरडीस होतो. तेव्हा आम्ही सर्व भक्तमंडळी त्यांच्याबरोबर छत्री धरून लेंडीपर्यंत जात असू. त्यांना तेथे सोडून आम्ही सर्व दूर अंतरावर उभे रहात असू. मला एकट्याला त्यांनी जवळ बोलाविले. माझ्या डोक्यावर वरदहस्त ठेवून मला म्हणाले,

''भाऊ, माझे एक काम करशील का?''

मी होकार दिल्यावर ते म्हणाले,

''शंभर रुपये एका पिशवीत घालून ती मला मशिदीत कोणाच्या नकळत दे.''

याप्रमाणे माझ्याजवळचे पैसे त्यांनी मागून घेतलेच व उसने घेतलेले पैसेही काढून घेतले. नंतर त्यांनी ज्या खुणा केल्या त्यांचा अर्थ मला समजला नाही.

''तुझ्यावर आकाश कोसळले तरी घाबरू नकोस. मी तुझ्याजवळच आहे.

माझ्या पहिल्या भेटीच्या वेळेस ते म्हणाले, ''तू दिलेली चिलीम मी सहा वर्षे ओढीत आहे.''

पण याचा अर्थ मला कळला नाही.

श्रीमंत बापूसाहेब बुट्टी यांचे दुसरे लग्न १९१६ साली शिरडीत झाले तेव्हा मी हजर होतो. मी शिरडी सोडून निघालो तेव्हा बाबा म्हणाले,

''मी तुझ्याबरोबर येईन.''

जरी स्थुल देहाने ते आमच्याबरोबर आले नाहीत तरी त्यांच्या कृपेने आमचा प्रवास सुखकर व निर्विघ्नपणे पार पडला. बाबांनी मला आशीर्वाद देऊन देह ठेवल्यावर माझे

खालील फायदे झाले. १९२० ते १९२६ पर्यंत मला दक्षिण सालसेटच्या २ऱ्या वर्गाचा मॅजिस्ट्रेट म्हणून नेमण्यात आले आणि १९२६ पासून मी जे.पी. आहे. मुंबई विधान परिषदेचा सदस्य म्हणून १९२१-१९२३ पर्यंत काम पाहिले. १९२० साली मला रावबहाद्दूर ही पदवी मिळाली.

## सौ. प्रधानांचे अनुभव...

एकदा माझी सर्व मुले आजारी पडली. त्यातल्या त्यात बाबूची प्रकृती डॉक्टरला चिंताजनक वाटली. मी बाबांची प्रार्थना केली. बाबांनी दर्शन दिले व म्हणाले,

''का रडतेस ? बाबू ठीक आहे. सकाळी ६, ६-३० वाजता त्याला चांगले खायला घाल.''

सकाळी उठून बाबू खेळायला लागलेला पाहून डॉक्टरला आश्चर्य वाटले. ते म्हणाले की त्याला खायला काही देऊ नका. पण मी बाबूला खायला दिलेले त्याला नीट पचले.

एके दिवशी रात्री ११ वाजता बाबा स्वप्नात येऊन म्हणाले,

''अग झोपलीस काय? उठ! तुझ्या मुलाला आकडी येणार आहे.''

मी लगेच उठले. मुलाला पाहिले. पण मुलाला ताप नव्हता. तरीपण खबरदारी म्हणून गरम पाणी वगैरे तयार ठेवले. रात्री दोनच्या सुमारास त्याला आकडी आली, पण वेळेवर केलेल्या उपचारांनी तासाभरानंतर तो शांत झाला. आमच्या सर्व मुलांना ही व्यथा होती.

एके दिवशी मशिदीत बसले असताना सहज मनात विचार आला की आज बाबा रुद्रावतार धारण करून आरडाओरड करणार की काय? पण त्यादिवशी बाबा एकदम शांत होते. मला म्हणाले,

''बघ, आज मी कोणावर ओरडलो नाही ना?''

माझी पूजा चालू असताना बाबा मध्येच म्हणाले,

''अगोदर घरी जा.''

मी जाऊन पहाते तो माझे लहान मूल जोरात रडत होते. मग त्याला शांत करून झोपवले व मी पुन्हा मशिदीत आले. बाबा म्हणाले,

''आता पूजा आटोपून घे.''

एकदा आमचे डॉक्टर मला म्हणाले की टायफॉईडमधून उठलेल्या मुलाला शिरडीस नेऊ नये. तरीपण आम्ही त्याला नेले. गाडीत त्याला ताप आला. मी केलेला वेडेपणा पाहून लोक हसतील असे वाटले. मुलास धड उठून बसताही येत नव्हते. पण बाबांच्याजवळ त्याला नेताच मुलगा उठून उभा राहिला. बाबा म्हणाले,

''लोक आता हसणार नाहीत बरे का!''

१६-१०-१९१८ रोजी रात्री मला असे स्वप्न पडले. बाबा अगदी मरणोन्मुख अवस्थेत दिसले. मी म्हणाले की बाबांचे निधन होणार की काय? बाबा म्हणाले,

सत्पुरुष निधन पावतो असे म्हणत नाहीत. सत्पुरुष समाधी घेतो असे म्हणतात.''

मी रात्री १२-३० वाजता खडबडून जागी झाले. सकाळी अण्णा चिंचणीकरांचे कार्ड मिळाले. त्यात बाबांनी दसऱ्याच्या दिवशी दुपारी २-३० वाजता देह ठेवला असे कळविले होते.

दुसऱ्या दिवशी रात्री बाबांनी स्वप्नात मला ३ रुपये दिले. पण मी घाबरले. स्वप्नात मिळालेले धन अशुभ असते असे मला वाटले. पण बाबा म्हणाले,

''घे घे आणि तुझ्या पेटीत जितके साठविले आहेस तितके मला दे!'' मी सकाळी उठल्यावर सर्व पैसे शिरडीस पाठवून दिले. त्याच रात्री बाबा माझ्या जाऊबाईंच्या स्वप्नात येऊन म्हणाले,

''माझ्या समाधीवर घालण्याकरिता पितांबर पाठव!''

त्याप्रमाणे तिने पितांबर पाठविला.

एकदा माझा प्रसुतिकाळ जवळ आला होता. म्हणून एक नर्स व सुईणीला आम्ही बोलावून घेतले. पण चार दिवस झाले तरी कळा नीट न आल्याने मी अडल्यासारखी झाले. नर्स म्हणाली की कोणतरी डॉक्टरला बोलावून आणा, पण माझ्या वहिणीने बाबांच्या फोटोसमोर उभे राहून प्रार्थना केली. ती नर्स पहात होती. लगेच माझी सुटका झाली. हे पाहून त्या नर्सला बाबांच्या सामर्थ्याबद्दल आश्चर्य वाटले.

## साई-अनुभव...

### ऑपरेशन टळले!

एक महिन्यापूर्वी माझ्या मुलीच्या जबड्यात गाठ आली व डॉक्टरना दाखविले असता डॉक्टर म्हणाले की ऑपरेशन करावे लागेल. मी डॉक्टरकडून फक्त गोळ्या आणल्या व बाबांना प्रार्थना केली,

''ऑपरेशन करायची पाळी नको येऊ दे! तुमच्या उदीने, तीर्थाने व फक्त गोळ्यांनी माझ्या मुलीला बरे वाटू दे!''

आणि खरेच माझ्या मुलीला बरे वाटले.

माझ्या सौभाग्यवतीला उष्णतेचा त्रास व्हायचा. तिला इकडच्या डॉक्टरांनी मुंबईस नेवून उपचार करावे लागतील असे सांगितले. पण तिलासुद्धा बाबांच्या उदीने व तीर्थामुळे बरे वाटले.

– कमलाकर डेरे

### अगाध तुझी कृपा

दिनांक २७-१-९१ रोजी रात्रौ ९-१५ वाजता माझा पाच वर्षाचा मुलगा दरवाज्याला चिकटून असलेल्या गटारात पडला. तो तोंडावरच पडल्यामुळे त्याच्या तोंडात गाळ गेला होता. डोके, डोळे, सर्व अंग, कपडे गाळाने भरले होते. रात्रीची वेळ होती. मला चिंता वाटत होती. काय करावे हे सुचत नव्हते. मी साईबाबांची विनवणी केली, प्रार्थना केली,

''माझ्या मुलाला सुखरूप ठेव!''

साईबाबांच्या कृपेमुळे माझ्या मुलाला कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाही.

– निम्वा वच्छाव

## श्री साईभक्तांना नम्र आवाहन

शिरडी संस्थान हे देशभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील श्री साईबाबांच्या लाखो भक्तांचे तीर्थयात्रेचे व श्रद्धेचे स्थान झालेले आहे. प्रत्येक दिवसागणिक भाविकांची वाढती लोकप्रियता या संस्थानला लाभली असून त्याची भारतातील एक प्रमुख विश्वस्तनिधि म्हणून गणना होत आहे.

गेली काही वर्षे साईभक्तांच्या सतत वाढणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या विविध सोयींवर अतोनात ताण पडत आहे. या लाखों भाविकांना शिरडीचा निवास सुखाचा व सोईचा व्हावा म्हणून संस्थानने सुखसोईंमध्ये वाढ करण्याचे ठरविले आहे.

''साईबाबा भक्त निवास'' अशी ५०० भाविक कुटुंबांची राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल उचलले आहे. या खोल्यांमधून भाविकांना सर्व सोयी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येतील. माफक दरात येथे भाविकांची राहण्याची सोय केली जाईल. याशिवाय सध्या उपलब्ध असलेल्या सभागृहापेक्षा मोठे, अशा २ सभागृहांची योजना असून या सोयींमुळे सुमारे ३,५०० अतिरिक्त भाविकांची उत्तम व्यवस्था होणार आहे. तसेच रात्रंदिवस सेवा चालू असलेले एक खाद्य-पेयगृहही त्याच जागेत असेल.

भाविकांची प्रत्यही वाढणारी संख्या लक्षात घेऊन मंदिराच्या परिसराच्या नूतनीकरणाची योजना त्यानंतर हाती घेतली जाणार आहे. या नूतनीकरणामुळे श्री साईबाबांचे दर्शन भाविकांना सुलभतेने व सहजतेने घेता येणार आहे. त्यांचा सध्याचा त्रास त्यामुळे कमी होईल.

शिरडी संस्थानच्या वतीने सध्याच्या १०० खाटांच्या इस्पितळाचा विस्तार, वैद्यकीय महाविद्यालय अशा आणखी योजना हाती घेण्यात येणार आहेत. इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबांच्या कृपेने व आशीर्वादाच्या बळावर संस्थानने वरील नमूद केलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. आपली मदत आम्हाला हरतऱ्हेने हवी आहे. भारताच्या उज्ज्वल सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन या प्रकल्पाकरिता देणगी दिल्याने होणार आहे.

शिरडी संस्थानच्या वतीने मा. अध्यक्षा आपणाला या कार्याकरिता उदारहस्ते मदत करण्याचे विनम्र आवाहन करीत आहेत.

आपल्या देणग्या खालील पत्त्यावर पाठवाव्यात :–

कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी
मु. पो. : शिरडी, तालुका : कोपरगांव, जिल्हा : अहमदनगर.

सूचना : चेक ''श्री साईबाबा संस्थान, शिरडी'' या नावाने पाठवावेत.

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी

### फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४" X २०" | २.२५ |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | ४" X ५" | ०.२५ |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २" X ३" | ०.१० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४" X २०" | २.२५ |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०" X १४" | १.२० |
| ६. | द्वारकामाई (४ रंगात) | ७" X १०" | ०.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १४" X २०" | २.२० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | १०" X १४" | १.१० |
| ९. | मूर्ती (४ रंगात) | ७" X १०" | ०.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४" X २०" | २.४० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०" X १४" | १.३० |
| १२. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७" X १०" | ०.६० |
| १३. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.२५ |
| १४. | पालखी (४ रंगात) | ७" X १०" | ०.६५ |
| १५. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४" X २०" | २.१० |
| १६. | ३-डी (शिरडी-दर्शन) | — | ४०.०० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ७.०० आहे.

**पुस्तके आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :–**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३ १०९.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३३.१५ | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | — | — |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | १८.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २४.०० | ११.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | १७.७५ | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २०.७० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २६.५० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ८.२५ | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ११.५० | १०.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ७.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ७.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ७.०० |
| १७. | स्तवनमंजरी | इंग्रजी | — | — |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.०० | ७.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ७.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | ०.९५ | ७.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ३.६० | ७.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | १.२५ | ७.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | २.५० | ७.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६.८० | ७.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | १.६० | ७.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ७.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | १.६० | ७.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ७.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | २.३० | ७.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ७.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ७.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४.५० | ७.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ७.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५.२५ | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ९-५० | १०-०० |

(पृष्ठ क्र. २ वरून)

गेल्यावर, बाहेरूनच मी ''ॐ नमो नारायण'' म्हणून त्यांना मी आल्याचे सूचित केले. प्रत्युत्तरादाखल त्यांनी 'नारायण' म्हटले. त्यावर बगिच्याचे लोखंडी फाटक उघडून मी आत गेलो. प्रथम तिथल्या शिवलिंगाला नमस्कार केला व झोपडीत प्रवेशलो; आत पाहिलं, शंकरगिरीजी 'कावा' बनवित होते. त्यांनी मला पाहून, दर्भाच्या चटईवर बसण्याचा मला अंगुलीनिर्देश केला व नारळाच्या कवडीत मला कावा पिण्यास दिला व माझे कुशल विचारले. कावा पिता पिता मी त्यांना विचारले, ''योगी महात्मा कधी येणार?'' त्यांनी उत्तरादाखल बाहेर अंगुलीनिर्देश केला व म्हणाले, ''पहा! त्या कारल्याच्या वेलाजवळ ध्यानस्थ बसले आहेत.'' मी उत्सुकतेने बाहेर पाहिले. ते सूर्याकडे पहात पद्मासन घालून ध्यानस्थ बसले होते.

मी शंकरगिरीजींना म्हणालो, ''हे महात्मा दसनामी संप्रदायाचे वाटत नाहीत.'' त्यावर शंकरगिरीजी म्हणाले, ''तुमचे अनुमान अगदी खरे आहे. ते वैष्णो संप्रदायाचे रामादली बैरागी साधु आहेत. त्यांचे नाव 'सरयुदासजी' आहे; आणि ते अयोध्येचे मुंडित आहेत. अजूनपर्यंत त्यांनी कुठेही आश्रम स्थापन करून आसन स्थिर केलेले नाही.''

शंकरगिरीजींकडून मिळालेल्या माहितीमुळे मी थोडा विचारात पडलो; कारण, मला असे समजले होते की, शंभुदली साधूंकडे वैष्णव साधु खूप कमी प्रमाणात राहतात. खूप वर्षापासून या दोन्ही संप्रदायांच्या अपरिपक्व विचारश्रेणींच्या साधूंमध्ये कमी-अधिक प्रमाणात विरोध व वैमनस्य चालूच आहे. त्यामागील कारण लघुताग्रंथी आणि गुरुताग्रंथी असे समजले जाते; त्यातून अनेक कारणे उपस्थित होत आहेत.

मी शंकरगिरीजींना सांगितले, ''आपल्याकडे पाहुणे म्हणून वैष्णव संप्रदायाचे साधु आले आहेत ही खूप आनंदाची गोष्ट आहे.'' माझ्या बोलण्याचा अर्थ ते समजले; त्यांनी स्पष्ट करून सांगितले की, ''सांप्रदायिक भेद भजनानन्दी साधूंना कधीही बाधक ठरत नाही. त्यांना सर्वच संप्रदाय व साधु वंदनीय आहेत. संत व सिद्धलोक भेदभावनेच्या वर्तुळात कधीही येत नाहीत. ते स्वतःच्या भजनात आणि कर्मकांडांत मग्न राहून सर्वांविषयी समभाव व प्रेम दाखवितात.''

तेवढ्यातच योगी महात्मा सरयुदासजी झोपडीत दाखल झाले. मी त्यांना उभा राहून नमस्कार केला. त्यावर त्यांनी अभयमुद्रेत हात उंच करून आशीर्वाद दिला. ते शंकरगिरीजींच्या धूनीजवळ स्वतःच्या मृगाजीनावर बसले. मी त्यांचे निरीक्षण करू लागलो. सुदृढ बांधा, खांद्याच्या जरा खाली असणारी नागवेलीसारखी जटा, सोनेरी दाढी-मिशांत झाकलेला तेजस्वी चेहरा, कपाळावरील रामपताकाचा टिळा, शांतसरोवरासारखे तृप्त डोळे! असे अनोखे, तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते त्यांचे!

थोड्या वेळाने त्यांनी शंकरगिरीजींना विचारले, ''हे कोण आहेत?'' त्यावर शंकरगिरीजींनी माझा थोडक्यात परिचय करून दिला. सरयुदासजी मला म्हणाले, ''चला! तुमच्याबरोबर राहून मला धार्मिक स्थळे पहाता येतील व आज शिवरात्रीचा दर्शनमेळा पहाणेही सुलभ होईल; कारण गिरनारक्षेत्रात मी प्रथमच आलो आहे; आणि शंकरगिरीजी तर एकदम रात्री 'शाही' बरोबरच निघतील.'' (साधुसमाजाची जी धार्मिक मिरवणूक निघते तिला साधुसमाजाच्या भाषेत 'शाही' म्हणतात.)

त्यांच्याबरोबर सबंध दिवस रहायला मला वेळ मिळाल्याने मला खूप आनन्द झाला. सुमारे १० वाजता आम्ही तेथून निघून जुनागढला आलो. तेथील ऐतिहासिक तसेच जुनी स्थळे पाहून परत पायथ्याच्या परिसरात आलो. तिथे भवनाथाच्या मागील बाजूस असलेल्या श्रीपंच जुना आखाड्यांत जेवण करून बोरदेवीच्या भागात फिरलो. तेथून संध्याकाळी सात वाजता वेला-बाबाच्या वडाच्या जागी येऊन थोडे दूर बसलो. फिरण्याच्या निमित्ताने आमचा दोघांचा चांगला परिचय झाला. सरयुदासजींकडून असे समजले की, ते चित्रकूट येथे मुंडित झाले होते आणि त्यांच्या गुरुमहाराजांच्या आदेशानुसार नेपाळला जाऊन ते योगाभ्यास करीत होते; त्यांचा अष्टांगयोगाचा अभ्यास चालू होता. नेती, धौती, नौलीकर्म, रेचक, कुंभक, प्राणायाम इत्यादी क्रिया त्यांनी चांगल्या प्रकारे आत्मसात केल्या होत्या. सध्या ते ब्रह्मरंध्रातून येणाऱ्या स्त्रोताचे शिक्षण घेण्यासाठी, आज्ञाचक्राला गतिमान करण्यासाठी ध्यान समाधीचा सतत अभ्यास करीत होते. मी त्यांना विचारले की, ''आपण जो अष्टांगयोगाचा अभ्यास करीत आहात, त्याच्या फलश्रुतीस्वरूपात आपण काय मिळवू शकला आणि आपले अंतिम ध्येय काय आहे?''

ते थोडा वेळ स्तब्ध झाले. मग म्हणाले, ''तुमचा प्रश्न जिज्ञासूच्या दृष्टीने योग्य आहे, परन्तु जर तुम्ही योगाभ्यास करीत असता तर, तुमच्या प्रश्नाचे विस्तारपूर्वक उत्तर देण्यास मला निश्चित आनन्द झाला असता. आताच्या तुमच्या प्रश्नात मला कुतूहल, नादानपणा, बेजबाबदारपणाच जास्त दिसून येतो आहे.''

त्यांच्या बोलण्यावरून मी समजलो. माझी चूक सुधारण्याचा प्रयत्न करीत मी म्हणालो, ''आपले म्हणणे बरोबर आहे. माझ्या प्रश्नात वास्तवतेचे प्रमाण खूपच कमी आहे; परन्तु योगाच्या बाबतीत मला रूची असल्यामुळे आपण मला त्याची प्राथमिक अनुभूति सांगा.'' त्यावर ते म्हणाले, ''योगक्रियेच्या अभ्यासात होणाऱ्या अनुभूति व्यक्त करण्यास गुरुची मनाई आहे. शिवाय तसेच काहीतरी अनिवार्य कारण तरी हवे. पण तुमच्या जिज्ञासेत कुठेतरी जिवन्तपणा आहे. त्यामुळे तुमचे समाधान करण्याकरिता थोडी चर्चा व प्रयोगात्मक प्रमाण जाणून घ्या.''

''पहा, समोरच्या मैदानात ८-१० गाई बसल्या आहेत. आता तुम्ही ज्या गाईला इकडे बोलवायला सांगाल तिला इच्छाशक्तीने बोलावितो.'' मी गाईंकडे पाहून एका गाईकडे बोट दाखवित म्हणालो, ''ती लहान शिंगाची, लाल रंगाची गाय आहे तिला

बोलवा.''

सरयुदासजींनी त्या गाईच्या कळपाकडे नजर स्थिर करत दीर्घ श्वास घेतला. थोड्याच सेकंदात त्या गाईने आमच्याकडे वळून पाहिले आणि लगेच उठून ती आमच्याकडे येऊ लागली. ती जवळ आल्यावर तिच्या डोक्यावरून हात फिरवून सरयुदासजींनी तिला परत जाण्याचा इशारा केला. ती लगेच परत फिरून स्वत:च्या जागेवर जाऊन बसली. ती जाऊन बसल्यावर सरयुदासजींनी श्वास सोडला. मी आश्चर्याने त्यांच्याकडे पाहू लागलो.

त्यांनी सांगितले, ''हा फक्त इच्छाशक्तीचा सहज प्रयोग आहे. त्याचे आणखीन् प्रमाण पहायचे असेल तर आता काय वेळ झाली आहे त्याची नोंद करा. तुमच्या परिवारातील व्यक्ती आता कुठल्या प्रकारची कामगिरी करीत आहेत ते लिहा व नंतर जाऊन शहानिशा करा.'' त्यांनी परिवारातील व्यक्तींची नावे, परिचय व त्याचवेळी त्या काय करीत आहेत त्या कामकाजाचे वर्णन केले. त्याची मी नोंद केली. त्यांनी ज्यावेळी परिवारातील व्यक्तींची मला नावे सांगितली, तेव्हाच मला त्यांच्या बोलण्याचे आकलन झाले व शंकेला स्थान राहिले नाही.

तेच पुढे म्हणाले, ''भूतकाळ व वर्तमानकाळातील अचूक गोष्टी सांगू शकता येतात. तसेच एकाग्रचित्त करून, शांत होऊन विचार केल्यावर सहजपणे भविष्यकाळाविषयी माहिती मिळते. दृढ मनोबल, दृढ इच्छाशक्ती, कालज्ञान, आंतरिक दृष्टी ही सर्व योगक्रियेची प्राथमिक फलश्रूती आहे.''

सरयुदासजींबरोबर जास्त परिचय वाढवावा या विचाराने आमच्याकडे येण्याचे त्यांना निमंत्रण द्यावे असा विचार मी करू लागलो. इतक्यात त्यांनी माझा मनोभाव जाणला. मला रमविण्यासाठी ते म्हणाले, ''काय! मिठाई खायला देण्यासाठी, मला येथून घेऊन जाण्याचा विचार करीत आहात काय?''

त्यांच्या दृष्टीने ती थट्टा होती; पण त्यामुळे माझ्या मनातील तर्क, वाक्‌चातुर्य, मानसिक योजना ही सर्वच दुरुपयोगी ठरली होती; कारण समोरील महात्माच असे होते की, ते माझ्या मनातील सर्व विचार, हेतु, योजना यांचे वाचन लीलया करू शकत होते. मी सर्व मनातील योजना बाजूला ठेवून, हात जोडून प्रेमाने, नम्रपणे त्यांना म्हणालो, ''मला मार्गदर्शन करा. खूप वाचन व परिभ्रमणामुळे मन स्थिर व शांत होण्याऐवजी, एकांतात ते विचारांची वावटळ व तुफान माजवते.'' त्यांनी मला मध्येच थांबवत म्हटले, ''आता याहून जास्त चर्चा तुमच्याकडे जाऊनच करू. चला! भवनाथाच्या मंदिराजवळ दरवाजापाशी उभे राहू या. शाही या बाजूलाच येत आहे.''

समोरील रस्त्यावरून दसनामी नागा साधु व्यवस्थित रांगेत मृगीकुंडात स्नानासाठी येत होते. असंख्य दर्शनार्थी कुतूहल, आश्चर्यचकित होऊन नागा जमातीला पहात होते. एक तरूण नागा महात्मा दोन्ही हातांत पट्टा (तलवारीचा एक प्रकार) घेऊन असाधारण स्फूर्तीने फिरवीत होता. एकीकडे दुसरा एक तरूण नागा महात्मा डी.एस्.पी. (पोलिस सुपरिटेंडंट ऑफ डिस्ट्रिक्ट) च्या जीपला जननेंद्रियाने खेचून घेऊन जाण्याचा अद्‌भुत प्रयोग दाखवत होता. लोक हा प्रयोग पाहून मुग्ध झाले होते. अर्थात् नागा महात्म्यांसाठी असा प्रयोग, ठराविक वेळेनुसार, अभ्यास केल्यानंतर, सहजसाध्य होतो; परन्तु संसारी लोकांना तो असंभव आहे. संपूर्ण शाहीचे संचालन अखिल भारत साधु समाजाचे सूत्रधार श्री. गोपालानन्द ब्रह्मचारीजी सांभाळीत होते. यांत शंकरगिरीजीही सामील होते. सर्वच महात्मा मृगीकुंडात स्नान करून आपापल्या स्थानांकडे जाऊ लागले. या शाहीबद्दल लोकवंदना अशी आहे की, यावेळी 'भर्तरीनाथ' आणि 'दत्तभगवान'सुद्धां गुप्त साधूंच्या रूपात स्नानासाठी येतात. हा कार्यक्रम पूर्ण झाल्यावर मी व सरयुदासजी शंकरगिरींच्याबरोबर त्यांच्या जागी गेलो.

सकाळी लवकर निघायचे असल्यामुळे लवकर झोपलो. सकाळी दिनचर्या आटोपून मी व सरयुदासजी शंकरगिरींची आज्ञा घेऊन सुरेंद्रनगरला रवाना झालो.

सरयुदासजींना 'रतनपर' येथे असलेल्या दत्तमंदिरात उतरवून, त्यांची सोय करून, मी थोड्या वेळाने येतो असे सांगून मी घरी गेलो.

संध्याकाळी मी दत्तमंदिरात गेलो तेव्हा, सरयुदासजी मंदिराचे महंत त्रिवेणीभारती यांच्याबरोबर बोलत होते. आरती-पूजा झाल्यावर मी व सरयुदासजी त्यांच्या खोलीत गेलो. थोड्या वेळाने इथे-तिथे निरीक्षण करून ते म्हणाले, ''तुम्हाला प्रश्न विचारण्याची काहीच जरूरी नाही. तुम्ही माझ्याकडून जे जाणून घेऊ इच्छिता, त्यातच तुमचे समाधान होईल.''

नंतर तेच पुढे म्हणाले, ''तुम्हाला हेच जाणून घ्यावयाचे आहे ना की, मी रामादली बैरागी साधु असून कर्मकांड व तपस्या सोडून योगमार्गाकडे प्रेरित कसा झालो?'' मी होकारार्थी मान हलवली. ते म्हणाले, ''माझ्या ज्या गुरुमहाराजांकडून मी मंत्रदिक्षा ग्रहण केली त्यांचे गुरुबंधु म्हणजे माझे काकागुरु तपस्येबरोबरच योगक्रियापण करीत. एकदा ते ध्यानस्थ असताना, सुषुम्ना नाडीचे निरीक्षण करतानाच त्यांना अखंड समाधी लागली. गेली २ वर्षे ते त्याच समाधी अवस्थेत आहेत. शारीरिक प्रक्रिया व्यवस्थित नियमितपणे चालू आहेत. अन्नपाणी घेण्याचा तर काही प्रश्नच नाही. फक्त वायुनेच जीवनकोष जिवंत आहे. या अवस्थेतून परत फिरण्याची क्रिया त्यांना माहीत नाही. आता ते ज्या अवस्थेत आहेत, ती अवस्था त्यांना अकस्मात लाभली आहे; त्यांना स्वत:ला कल्पनापण नसेल की, अशा प्रकारची समाधी लागेल. रात्रीच्या प्रशान्त वातावरणात त्यांच्या शरीरातून जणू दूर दूर समुद्र-गर्जना व्हाव्यात असा आवाज निरंतर ऐकायला येतो. त्यांचे शरीर सध्या गुप्त ठिकाणी सुरक्षित ठेवण्यात आले आहे. त्यांच्याजवळ माझ्या गुरुमहाराजांशिवाय कुणालाही जाण्याची मनाई आहे. शरीरात प्राण असला तरी ते निष्प्राण अवस्थेत आहेत. फक्त हृदय रक्ताचे संचालन करते; सर्व नाड्या शांत आहेत. खूप प्रयत्न व औषधांनंतरही काही परिणाम झाला नाही; तेव्हा माझ्या गुरुमहाराजांनी मला त्यांच्या गुरुमहाराजांकडे जाण्याचा आदेश दिला. माझ्या गुरुमहाराजांचे गुरु म्हणजे माझे दादागुरु. ते नेपाळात हिमालयाच्या हिमाच्छादित पहाडांत 'गोडाझील' नावाच्या

सरोवराजवळ गुहेत निर्विकल्प अवस्थेत रहातात. त्यांच्याकडे जाण्याअगोदर माझ्या गुरुमहाराजांनी मला संपूर्ण बाबतीत तयार केले. मला नेपाळला जाण्याचे प्रयोजन समजावण्याआधी माझ्या काकागुरुंचे काय महत्त्व आहे ते समजवण्यासाठी ते म्हणाले, ''तुझे काकागुरु आपल्या रामादली आखाड्याचे महामंडलेश्वर आहेत. इतकेच नव्हे तर ते कुशल सूत्रधारही आहेत. अलाहाबादच्या कुंभमेळ्याला फक्त दीड वर्षाचा अवधी आहे; आणि जर ते स्वस्थ झाले नाहीत तर आपली जमात नेतृत्त्वहीन होईल. अयोध्येच्या हनुमानगुढीच्या गुप्त भांडाराच्या 'भांडारी' सदस्यांपैकी ते एक भांडारी आहेत. ही सर्व कारणे महत्त्वपूर्ण अशासाठी की, आता तुला तुझे कर्मकांड सोडून हे कार्य करणे अत्यंत जरुरीचे आहे.''

या कारणामुळे मला नेपाळला जाऊन दादागुरुंकडे योगाभ्यास करण्याचे माझे कर्तव्य ठरते. येत्या दीड वर्षात मला माझे ध्येय पूर्ण करायचे आहे. हा माझा दृढ संकल्प आहे. आता जुनागढला येण्यामागचा माझा हेतु या कामगिरीशी संबंधित आहे.''

मी प्रश्न करणार होतो की, ''आपल्या काकागुरुंच्या स्वास्थ्याशी जुनागढचा काय संबंध ?'' त्याआधीच ते पुढे म्हणाले, ''मी तीन दिवसांपासून जुनागढलाच होतो. माझ्या दादागुरु मंगलदासजींच्या आज्ञेनुसार मी जुनागढला आलो. गिरनार ही 'सिद्ध टेकडी' आहे. (सिद्ध महात्मा या गिरनार टेकडीला 'सिद्ध टेकडी' म्हणतात.) तिथे कमंडलु कुंडाच्या खालच्या विस्तारात एक सिद्ध महात्मा गुप्त पोकळीत (गुहेत) रहातात. त्यांची भेट आताच शक्य होती, कारण ते १२ महिन्यांतून फक्त एकदाच बाहेर येतात. शिवरात्रिप्रसंगी सिद्धपुरुष तसेच नाथमंडळाबरोबर संपर्क साधण्यासाठी, तसेच धर्म संप्रदायाच्या गुरुद्वाराच्या मर्यादेचे पालन करण्यासाठी फक्त एकच दिवस बाहेर येतात.

माझ्या दादागुरुंचा आदेश होता की तू तिथे जा. कमंडलु कुंडाच्या खाली एक झरा आहे; तिथे पश्चिम दिशेला एक मोठी शिळा भिंतीसारखी दिसते. तिथे जाऊन माघ वद्य त्रयोदशीच्या रात्री २ वाजता शंखध्वनीद्वारा 'दत्तदाता' (दत्त...दा...ता) चा शब्द तीन वेळा फूंक (वाजव). म्हणजे ते महात्मा तुला येण्यासाठी गुहेचे द्वार उघडतील. तू जाण्याआधी मी त्यांना तुझ्या येण्याचा संदेश पाठवीन.

दादागुरुंनी योगक्रियेने कमंडलु कुंडाच्या परिसरात रहात असलेल्या सिद्ध महात्मा सुंदरगिरीजींना माझ्या पोहोचण्याचा संदेश पाठवला.

दादागुरुंच्या आदेशानुसार माघ वद्य त्रयोदशीच्या रात्री कमंडलु कुंडाच्या खाली पश्चिमेला जाऊन मी शंखध्वनी केला; तेव्हा समोर काळ्याकुट्ट दिसणाऱ्या शिळेजवळ एक फट होती, जी झाडा-झुडुपांमुळे झाकलेली होती, मोठ्या मुश्किलीने आत जाऊ शकू इतकाच मार्ग होता, तो प्रकाशमय झाला. दोन्ही शिळाखंडाच्या मधल्या फटीतून शरीर घासत-घासत जवळजवळ २ ते २॥ फूट गेल्यावर मला १०० ते १२५ फूटांची एक विशाल गुहा दिसली. या गुहेत महात्मा सुंदरगिरीजी व्याघ्रांबरावर विराजमान होते.

एकदम कृश आणि शुष्क देह झालेला दिसत असूनसुद्धा, चेहरा अत्यंत तेजस्वी, प्रभावशाली व संपूर्ण देह भस्मचर्चित तसेच तेजोमय दिसत होता. संपूर्ण दिगंबर अवस्थेतील महात्मा सुंदरगिरीजींनी माझे स्वागत करून मला बसण्यास सांगितले.

त्यांच्या गुहेच्या मागील भागात पहाडातील लहान झरा एका छोट्या कुंडात एकत्र होत होता. त्याखालील थोड्या भागात दगडाची शिळा व मातीची जमीन होती. त्या जमिनीत सुंदरगिरीजींनी ५-६ सिद्ध व दिव्य वनस्पतींची स्थापना केलेली होती.

वातावरण खूप शांत, गंभीर व आत्म्याला अत्यधिक प्रसन्नता देणारे होते. त्यांनी मला माझ्या दादागुरुंचा संदेश सांगितला व माझ्या इथे येण्याचे प्रयोजनही जाणले. ते म्हणाले, ''तुला तुझ्या दादागुरुंनी एक दिव्य वनस्पती 'काळी हळद' घेण्यासाठी इथे पाठवले आहे. ती वनस्पती तुझे काकागुरु, जे समाधीवस्थेत आहेत, त्यांच्या कल्याणार्थ उपयोगात आणावयाची आहे.'' सुंदरगिरीजींनी सांगितले की, ''ही काळी हळद एक अद्‌भुत व अप्राप्य औषधी आहे, जी स्वत: भगवती कालीमातेच्या प्रसादस्वरूपात साक्षात् आहे. जगातील कुठलेही रोग, विषमज्वर, दारिद्र्य, व्याधी, भय, अपमृत्यू तसेच तिन्ही लोकांतील प्रत्येक कोटीचे देव, भूत, गण, पिशाच, देव, गंधर्व, वेताळ इत्यादींच्या परितापांतून ही मुक्त करते. ही दिव्य वनस्पती घेऊन तुला सूर्योदयापूर्वी येथून निघावयाचे आहे.'' असे सांगून ते उठले आणि कमंडलु भरून पाणी त्या झऱ्यातून त्यांनी भरले.

समोर एका कोमजलेल्या दिसणाऱ्या रोपटाजवळ ते पद्मासन घालून बसले व हातात पाणी घेऊन, काही मंत्र म्हणून, ते त्यांनी त्या रोपट्यावर हळूच सोडले. त्याबरोबर मूर्च्छित माणसावर पाण्याचा शिडकावा करताच तो जसा जागृत होतो, तसेच ते रोपटे जागृत होऊन, प्रफुल्लीत बनून, कळी उघडून फूल बनावे तद्वतच ताजेतवाने व हिरवेगार दिसू लागले. हा हिरवा प्रकाश त्यांच्या अंतरंगातून आजूबाजूला पसरत होता. तो खूप सुंदर व डोळ्याला सुखद असा होता.

सुंदरगिरीजींनी त्याला नमस्कार करून एका हरीणाच्या शिंगाने त्याच्या मुळाशी हळू खोदून त्याच्या मुळांत असलेल्या लहान हळदीच्या गाठीला बाहेर काढले. जणूकाही रातकिड्यांच्या लहान समुहाला मलमलीच्या लहान कपड्यात बांधून घ्यावे, तशी ती 'काळी हळद' दिसत होती.

मी अत्यंत विस्मयचकित झालो होतो. दोन अडीच वर्षांपासून मी हिमालयाच्या गुहेत महान सिद्ध दादागुरुंच्या सान्निध्यात जसा मानसिक परमशांतीचा अनुभव घेत होतो, तशीच शांती मला इथे मिळत होती.

सुंदरगिरीजींनी एका लहान दिसणाऱ्या तुंबडीत थोडी विभूती धूनीतून घेऊन टाकली; त्यावर काळी हळद ठेवून मला संबोधून ते म्हणाले, ''या प्रसादाला सांभाळून तुझ्या झोळीत ठेव आणि तुझ्या दादागुरुंना दे; तसेच त्यांना माझा नमस्कार सांग.''

मी त्यांना दंडवत प्रणाम् करून त्यांचा आशीर्वाद घेऊन त्या फटीतून बाहेर आलो. पहाट व्हायला खूप अवकाश होता, तेथून गिरनारचा पायथा खूप दूर होता. रस्ताही

परिचित नव्हता; तरीपण, अतिशय सरलतेने, निर्भयपणे थोड्या वेळात मी शंकरगिरीजींच्या जागेपर्यंत येऊन पोहोचलो.

तेथून परत येताना, मी तर महात्मा लोकांच्या गुप्ततेविषयी व समर्थतेविषयी विचार करू लागलो. मला दिक्षा घेऊन खूप वर्षे झाली. त्यानंतर दादागुरुंच्या संपर्कात आल्यावर मला असे वाटू लागले की, ''माझ्यात काहीतरी विशेष आहे'', पण, सुंदरगिरीजींच्या दर्शनाने माझ्यातील काही विशेषपण वाफेसारखे विरून गेले. अद्यापही असे अनेक सिद्धपुरुष गिरनारक्षेत्रात पर्वतपोकळींत अखंड तपस्यारत आहेत.''

सरयुदासजींच्या गोष्टी ऐकल्यानंतर अनेक प्रश्न माझ्या मन:पटलावर उमटले व थोड्या वेळातच त्या प्रश्नांचे, जिज्ञासेत व जिज्ञासेचे इच्छेत रुपान्तर झाले. माझ्या मनात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीतीने या महात्म्यांना भेटण्याच्या इच्छा जागृत झाल्या, मन:चक्षूसमोर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या सरयुदासजी, सुंदरगिरीजी, सरयुदासांचे गुरु रामकृपालदासजी, त्यांचे काकागुरु जानकीदासजी आणि सरयुदासजींचे दादागुरु मंगलदासजी उपस्थित झाले व सरयुदासजींकडून प्रसंग व प्रयोजन ऐकल्यावर त्यांच्या भेटीची इच्छा अत्याधिक तीव्र झाली.

साधुसमाजात गुरु-परंपरा पद्धतीनुसार कोणत्याही साधूचा गुरु असेल तोच 'गुरु' समजला जातो. गुरुंच्या गुरुंना 'दादागुरु' म्हणतात. त्या दादागुरुंचे जर ४ शिष्य असतील तर त्यांना 'काकागुरु' सारखे मानले जाते. काकागुरुंद्वारा बनलेल्या शिष्यांना 'गुरुबंधु' म्हणून समजले जाते.

थोडक्यात आपल्या कौटुंबिक रचना-पद्धतीप्रमाणे सहजरीत्या परिचयानुसार ही रचना झालेली आहे. शंभुदली व रामादली संप्रदायांत ही पद्धती आहे.

सरयुदासजींना मी म्हणालो, ''आपल्या गोष्टी ऐकल्यावर आश्चर्यासहित एका नवीन आनंदाची अनुभूति मनाला मिळते; व जिज्ञासू मनाला एक नवीन अनुभवही मिळतो. जर आपण नाराज होणार नसाल तर माझ्या समाधानासाठी काही प्रश्न विचारायची माझी इच्छा आहे.''

सरयुदासजी संमती दर्शवित मला म्हणाले, ''माझी उत्तरे ऐकल्यानंतर तुम्ही तुमच्या इच्छेचे समाधान करण्याऐवजी त्याच्या आधीन होण्यास प्रेरित व्हाल. त्यातून लाभ किंवा हानी होईल, ती तुम्हालाच सहन करावी लागेल.

मी क्षणभर विचार केला; पण भावी परिस्थितीला समजण्याची, जाणून घेण्याची असाधारण मनुष्यासारखी दृष्टी माझ्याजवळ नव्हती. भविष्याबद्दलचा अज्ञानीपणा हा अंध:कारासारखा आहे. या अंध:कारातून ध्येयाकडे जाण्यासाठी दृढ श्रद्धा व मनोबलाची नितांत जरूरी असते. परिणामांची चिंता केल्याशिवाय मी संकल्प केला की, मला यात उडी मारायची आहे. मी म्हणालो, ''आपले म्हणणे मला मंजूर आहे.'' त्यावर स्मित करीत ते म्हणाले, ''विचारा! काय समजून घेण्याची आपली इच्छा आहे?'' मी पहिला प्रश्न केला, ''आपले काकागुरु म्हणजे जानकीदासजी आकस्मिकरीत्या अखंड समाधीत गेलेले आहेत. माझ्या समजुतीप्रमाणे ही अवस्था अत्यंत दुर्लभ व हिची प्राप्ती त्यांना सहजरीत्या झालेली असताना त्यांना या अवस्थेतून परत आणण्याची काय गरज! व त्यांना पुनश्च सहज व स्वस्थ अवस्थेत आणण्यासाठी आपला उपयोग माध्यमासारखा करण्यामागे काय रहस्य आहे? मंगलदासजींसारखे महान समर्थ योगीपुरुष, तसेच सुंदरगिरीजींसारखे समर्थ सिद्ध महात्मा हे कार्य स्वत:च्या योगसिद्धीने व तपोबलाने करू शकत नाहीत का?''

एकापाठोपाठ एका प्रश्नांची सुरुवात मी कुठल्यातरी क्षोभ, अज्ञान, उतावीळपणा, भय इत्यादी मिश्र भावनेने केली. ते प्रश्न ऐकल्यावर सरयुदासजी विचारमग्न झाले. त्यांनी डोळे बंद केले. वातावरणात नीरव शांतता पसरली. त्यांच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या प्रत्येक हावभावाचे मी बारकाईने निरीक्षण करू लागलो. माझ्या प्रश्नांनी त्यांच्या अंतर्मनाला डिवचले असेल, या विचारांनी मी चिंतीत बनलो. काही अनुचित होऊ नये असे मी मनापासून इच्छिले. त्यांच्या मौनाने मला अधिकच अवघडल्यासारखे झाले. दहा मिनिटांनी त्यांनी डोळे उघडले; व ते गंभीर स्वरांत मला म्हणाले, ''आधी सांगितल्याप्रमाणे जानकीदासजी आमच्या जमातीचे मुख्य सूत्रधार आहेत. जोपर्यंत अलाहाबादमधील कुंभमेळा पूर्ण होत नाही, तोपर्यंत जबाबदारी त्यांच्या शिरावर आहे; याप्रकारची व्यवस्था साधुसमाजात असते. रामादली संप्रदायांत 'मर्यादा' ही गोष्ट सर्वांत महत्त्वाची मानली जाते. जीवनाच्या कोणत्याही लौकिक तसेच अलौकिक व्यवहारप्रसंगी कुठेही मर्यादेचे उल्लंघन होणार नाही, याची बारकाईने दक्षता पाळावी लागते. जर या कुंभमेळ्यात जानकीदासजी स्थूलरूपाने (जिवन्त अवस्थेत) असतील आणि साधु शाही परंपरेनुसार भंडार, सुत्र आणि कारभाराची जबाबदारी आखाड्याच्या आदेशानुसार सांभाळली नाही तर परंपरेचे उल्लंघन होते. एखाद दुसरा आरोप ठेवला जातो. असे अनेक प्रश्न सोडवण्याचे राहूनच जातात.''

''दुसरी गोष्ट अशी की, माझे गुरु रामकृपालदासजी आता वृद्ध झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे, जानकीदासजी योगक्रियेचा अभ्यास करीत होते. त्यात असे अकस्मात घडले, त्यामुळे ते स्वत:च्या देहाला किंवा तपस्येला आहूती मानून, ती आहूती देऊन, जानकीदासजींना पूर्वावस्थेत आणण्याचे कर्तव्य मानतात.''

''मला माध्यम म्हणून पसंत करण्यात आले हे मी माझे सद्भाग्य समजतो; तसेच माझ्या गुरुलोकांसाठी काही करण्याची संधी प्राप्त झाली, वा त्यांच्या कामाचे निमित्त बनण्याची संधी मिळाली, हेही सद्भाग्यच! माझ्या योगक्रियेच्या अभ्यासाद्वारा माझे एकच उद्दीष्ट आहे ते म्हणजे, जानकीदासजींच्या आज्ञाचक्राला क्षणभर थांबवून, मूलाधार चक्राबरोबर त्यांची चेतना जोडून त्यांना पूर्वस्थितीला घेवून यावयाचे. अर्थात् हे कार्य बोलण्याइतके सोपे नाही.''

सरयुदासजींचे बोलणे मी लक्षपूर्वक ऐकत होतो; समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो. रात्रीचा शेवटचा प्रहर होता; वातावरण जरा गंभीर वाटत होते. सरयुदासजींना मी, ''चहा घेणार का?'' असे विचारले. त्यांनी संमती दर्शवली. मी चहा बनवून घेऊन आलो. चहा घेतल्यावर मी त्यांना चिलमीविषयी विचारले. त्यावर ते म्हणाले, ''योगसाधना करताना कुठल्याही मादक पदार्थाचे सेवन वर्ज्य आहे, त्यामुळे, मी चुकूनही मादक

पदार्थांचे सेवन करीत नाही. याशिवाय चिलिम ही योगिनी आहे, तिचे सेवन विशिष्ट प्रक्रियेनुसार जर केले गेले नाही तर चिलिमीतील मादक पदार्थ तिचे सेवन करणाऱ्यास मारक ठरतात. अग्नीतत्त्वाची साधना करणारा साधक रूई आणि धोत्र्याचे सेवन करतो; जलतत्त्वाचे परिवर्तन करणारा साधक गांजा, बचनाग व भांगेचे सेवन करतो.

वायुतत्त्वाचे उर्जेत रूपान्तर करणारा साधक सोमल (आर्सेनिक), नवसवोमिका यांचे सेवन करतो. खूप महात्मा चिलिमीमध्ये तांब्याचा पैसा ठेवून चिलिम ओढतात. या पैशाचे रूपान्तर सोन्यामध्ये होते. ही एक अत्यंत सोपी प्रक्रिया आहे; परन्तु कुणीही चिलिमीचे फायदे वाचून, लोभाला बळी पडून, चिलिम ओढल्यास त्याचे नुकसानच होते.''

''॥देखा देखी साधे जोग। जो मिटे काया और बढे रोग॥'' म्हणजे, योगाचे केवळ फायदे वाचून, जे लोक घाईघाईने योगसाधना करू जातात, त्यांचा फायदा होण्याऐवजी, नुकसानच होते.

सरयुदासजींच्या स्पष्टवक्तेपणाने मी प्रभावित झालो; व त्यांना नम्रतेने म्हणालो, ''मला आपल्याबरोबर नेपाळला, आपले दादागुरु मंगलदासजींच्या दर्शनास येण्याची तीव्र इच्छा होत आहे. मला आपण घेऊन जाल का?'' यावर सरयुदासजी म्हणाले, ''तुम्ही असे विचारणार हे मला पूर्णपणे ठाऊक आहे. परन्तु तुमच्या माझ्याबरोबर येण्याने होणाऱ्या लाभ-हानीची जबाबदारी तुमच्यावर राहील.'' त्यांच्या अशा बोलण्याने मला त्यांचा होकार की नकार काहीच समजले नाही. म्हणून मी त्यांना पुन्हा विचारले. यावर ते म्हणाले, ''दादागुरुंच्या परवानगीशिवाय मी तुम्हाला त्यांच्याकडे नेऊ शकत नाही; परन्तु एक गोष्ट करता येईल. तुम्ही माझ्याबरोबर काठमांडूला चला; तेथून पुढे हिमालयाच्या अंतर्भागात 'वज्रनाथजी' नावाचे एक महान तांत्रिक रहातात; ते माझे परममित्र आहेत, त्यांच्याजवळ तुम्ही रहा; व मी दादागुरुंकडे जाऊन तुमच्यासाठी त्यांची परवानगी घेईन व त्यांनी परवानगी दिली, तर तुम्हाला त्यांच्याकडे घेऊन जाईन.''

सरयुदासजींच्या या प्रस्तावाचा मी लगेच स्वीकार केला. सकाळचे चार वाजले होते म्हणून त्यांनी आराम करण्यासाठी मला घरी जाण्यास सांगितले. त्यांनाही त्यांच्या ध्यान-धारणादि क्रिया करावयाच्या होत्या. जाण्याअगोदर मी त्यांना म्हणालो, ''आज रात्रीची तिकिटे काढून आणतो. आपण इथून दिल्लीला जाऊ. तेथून विमानाने काठमांडूला जाऊ.'' याप्रमाणे कार्यक्रम नक्की करून मी घरी गेलो. घरी जाऊन थोडा आराम करून, माझ्या व्यवसायाची जबाबदारी भावाकडे सोपवून, मी संध्याकाळीच सरयुदासजींकडे आलो. त्यांना 'जय सियाराम' म्हणत अभिवादन केले. त्यांनी मला बसण्यास सांगितले. त्यांनी आपले सर्व सामान एका पिशवीत भरले; भरता भरताच त्यांनी गाडीचे रिझर्वेशन, वेळ, इत्यादींविषयी चर्चा केली. माझ्या मनात काळ्या हळदीविषयी बरेच कुतूहल होते; परंतु त्यांना कसे काय विचारावे, या विचारात मी होतो; कारण सरयुदासजींबरोबर बोलताना सतत एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल; ती म्हणजे, मनात उमटणारा प्रत्येक विचार ते समजू शकत होते.

मी त्यांना विचारले, ''एक गोष्ट विचारू? आपल्याला सुंदरगिरीजींनी दिलेली दिव्य वनस्पती 'काळी हळद' मला पहावयाची आहे.'' यावर ते म्हणाले, ''ही वनस्पती जोपर्यंत दादागुरुंच्या हाती सोपवली जात नाही, तोपर्यंत कुणालाही ती दाखवणे योग्य नाही. या वनस्पतीचा दादागुरु कशा पद्धतीने वापर करणार आहेत, ते मला ठाऊक नाही; परन्तु ही एक अलौकिक वनस्पती आहे. तिचे दर्शनही दुर्लभ आहे. दारिद्र्य दूर करणे, कोणत्याही आधी-व्याधींना दूर करणे इत्यादी गोष्टी या वनस्पतीने सहजसाध्य होतात. या वनस्पतीला संस्कृतमध्ये 'अपराजिता' असे म्हणतात. 'भैरवतंत्र' नामक ग्रंथात या वनस्पतीची माहिती आहे.

योगी या वनस्पतीद्वारे पाऱ्याचे बंधन करून त्या पाऱ्याची एक गुटिका (गोळी) बनवतात. ही गुटिका (गोळी) तोंडात ठेवली असता आकाशगमन करता येते.'' मी त्यावर विचारले, ''योगामध्ये आकाशगमनसिद्धीचे वर्णन आहे. खरंच! योगसाधनेने साधक आकाशगमन करू शकतो काय!'' यावर सरयुदासजी म्हणाले, ''आकाशगमनाचे २/३ प्रकार आहेत. उत्कट ध्यानावस्थेमध्ये साधक दिव्यलोकात भ्रमण करतात, यालाही 'आकाशगमन' म्हणतात. पाऱ्याला बंधीत करून आकाशगमन करण्यात येते. तिसरे म्हणजे योगसाधनेद्वारा साधक सूक्ष्म किंवा स्थूल शरीराद्वारे आकाशभ्रमण करू शकतो. सूक्ष्म देहाद्वारे जेव्हा साधक भ्रमण करतो तेव्हा त्याला इच्छित स्थळी आपल्या सूक्ष्म शरीराद्वारे जाता येते; व आवश्यक ते कार्य करता येते. इतकेच नव्हे तर या सूक्ष्म शरीराला इच्छाशक्तीद्वारे काही काळापुरते स्थूलरूप देऊन कुणाच्याही भेटीगाठी, संभाषण इत्यादी करता येते.

स्थूल शरीराद्वारे आकाशगमन, सिद्धी प्राप्त करणे थोडे अवघड आहे. यासाठी २ पद्धती आहेत. साधकाला नेती, धौती, बस्ती, नौली, वज्रोली इत्यादी क्रियांमध्ये प्रवीण व्हावे लागते. तद्नंतर जीभेच्या खालील शिरेला मीठ, अक्कलखडा, मायफळ, रिंगणीचे मूळ इत्यादी पदार्थांने घासून ही शिर कापण्यात येते. त्यामुळे जीभ लांब होते. यानंतर जीभ उलट फिरवून टाळूचाला लावतात व ब्रह्मरंध्रातून होणाऱ्या अमृतस्त्रावाचे पान केले जाते. यानंतर काही विशिष्ट प्राणायामाद्वारे शरीराला हलके बनविण्यात येते व असे हे हलके शरीर आकाशगामी व जलगामी बनते. साधकाला पाण्यावरून चालणे व आकाशातून उडणे या दोन्ही गोष्टी सहज शक्य होतात. तांत्रिक साधक वनस्पती योगाद्वारे आकाशगमन करतात. या क्रियेत 'तिबेटी लामा' फार प्रवीण आहेत.''

**योगक्रिया**

दिल्लीला जाणाऱ्या ट्रेनने आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळीच दिल्लीला पोहचलो. टॅक्सी करून 'कमलानगर' येथील माझ्या नातेवाईकांकडे गेलो. त्यांना मी अगोदरच तार करून काठमांडूसाठी 'नेपाळ रॉयल सर्व्हिसेस'ची २ तिकिटे बुक करण्यास सांगितली होती. विमान संध्याकाळी सुटणार होते. मी विमानतळावर फोन करून विमान कधी सुटणार आहे, त्या वेळेची खात्री करून घेतली. दैनंदिन दिनचर्या आटोपून मी आवश्यक सामान खरेदीसाठी बाहेर पडलो.

सुमारे ४ वाजता मी खरेदी आटोपून घरी आलो तेव्हा सरयुदासजी थोडे

विचारमग्नच दिसले. मला आलेला पाहून ते म्हणाले, "आपण आजची तिकिटे रद्द करून तीन दिवसांनंतरची तिकिटे रिझर्व्ह करा." त्यांच्या या निर्णयाने मी बुचकळ्यात पडलो. माझ्याकडे पहात ते म्हणाले, "आजची फ्लाईट पाटण्याला जाऊन तिथेच थांबून राहील. तिचे पुढील उड्डाण रद्द केले जाईल. हवामान खराब झाल्याने आपल्याला २ दिवस तिथेच थांबावे लागेल."

विमान उड्डाणाला अजून अडीचतास अवकाश होता. मी लगेच टॅक्सी करून पालम विमानतळावर गेलो व तिथे तिकिटे रद्द करून तीन दिवसानंतरची तिकिटे बुक केली. ऑफिसच्या बाहेर आल्यावर कंट्रोल रूममध्ये हवामानाविषयी चौकशी करता असे समजले की, "हवामान चांगले आहे व फ्लाईट नियोजित वेळेनुसारच रवाना होईल." मी जास्त खोलात न शिरता कंट्रोलरूमचा फोननंबर डायरीत नोंदवून घरी परतलो.

घरी आल्यावर सरयुदासजींना मी सर्व हकिकत सांगितली. त्यांनी माझे बोलणे शांतपणे ऐकून घेतले व म्हणाले, "चला! आपण जरा बाहेर मोकळ्या हवेत फिरून येऊ." आम्ही दोघेही घराबाहेर पडलो; व 'नॅशनल पार्क'ला गेलो. तिथे सरयुदासजी थोडा वेळ बसले, मीही गवतावर बसलो. आधीच थंड असणारे वातावरण हळूहळू अधिकच थंड होत गेले. सरयुदासजी विचारमग्न होते. असाच थोडा वेळ गेला. वातावरणांत थंडी अधिकच वाढली. ते मला म्हणाले, "चला! थंडी वाढायला लागली आहे. शिवाय तुम्हाला ८ वाजता विमानतळावर फोनही करावयाचा आहे." मला त्यांच्या त्या बोलण्याचे आश्चर्य वाटले. नंतर आम्ही घरी आलो.

रात्री ८ वाजता मी विमानतळावर संध्याकाळी सुटलेल्या फ्लाईटसंबंधी चौकशी केली तेव्हा समजले की, खराब हवामानामुळे ते फ्लाईट पाटण्याला जाऊन थांबले होते. या प्रसंगामुळे माझ्या मनातील सरयुदासजींबद्दलचा आदरभाव द्विगुणीत झाला. त्यांचे सामर्थ्य व स्वभाव असाधारण होता. मी त्यांच्या आसनाजवळ गेलो व गप्प बसलो. थोड्या वेळाने ते म्हणाले, "निसर्गाने प्रत्येक जीवाला काही विशिष्ट देणग्या दिल्या आहेत. पशु-पक्ष्यांमध्ये विशिष्ट संज्ञासूचक शक्ती, आगावू घटनांचे ज्ञान देणारी शक्ती सामावलेली असते. उदा. – जंगलात संध्याकाळी सर्वप्रथम जो कोल्हा ओरडतो, त्याला एक लहानसे शिंग असते. हे शिंग तांत्रिक लोकांना तंत्रशास्त्रात उपयोगी असते. त्याच्या सर्वप्रथम होणाऱ्या आवाजाद्वारे भिल्ल शिकारी त्याची शिकार करतात; तेव्हा त्याच्या विशिष्ट आवाजामुळे तो ओळखला जातो. टिटवी अशा ठिकाणी आपली अंडी ठेवते, जिथे पावसाचे पाणी पोहचणार नाही. तिने ठेवलेल्या अंड्यांवरूनच पावसाविषयी अंदाज करण्यात येतो.

सकाळी आरवणाऱ्या कोंबड्याच्या तुऱ्याचा रंग वेळेप्रमाणे बदलतो. जेव्हा शुभ-चौघडा वाजतो, तेव्हा त्याचा तुरा लालभडक असतो. जेव्हा अशुभ-चौघडा वाजतो तेव्हा त्याच्या तुऱ्याच्या रंगांत मलीनता येते. यावरून जाणकार लोक चौघड्याविषयी अचूक माहिती जाणू शकतात. तंत्रातसुद्धा पशुपक्ष्यांच्या घरट्यांचा, पिसांचा, चोचींचा, हाडांचा, जीभेचा, डोळ्यांचा व मांसाचा उपयोग केला जातो. याप्रमाणे निसर्गाने मनुष्यालाही अलौकिक शक्ती बहाल केली आहे."

मी सरयुदासजींना म्हणालो, "जोपर्यंत शंकानिर्मूलन होत नाही, तोपर्यंत विश्वास दृढ होत नाही. संकटसमयी विश्वास डळमळतो." मी परत सरयुदासजींना क्षमायाचना करून सांगितले, "आपण माझ्या विश्वासाला काही प्रमाण दाखवून दृढ करा; आपली परीक्षा घेण्याचा माझा हेतु नाही; फक्त माझा विश्वास आपल्या ठायी दृढ व्हावा, यासाठी आपली प्रार्थना करीत आहे."

माझे बोलणे ऐकून थोडा वेळ ते गप्प बसले. त्या शांततेचे मला भय वाटले. नंतर शांत व गंभीर स्वरात ते मला म्हणाले, "आता आराम करा. उद्या तुमच्या समाधानासाठी मी एक प्रयोग करेन; मात्र या प्रयोगानंतर तुमचे समाधान होईल वा नाही, हे तुमच्या प्रकृती व संस्कारावरती अवलंबून आहे. एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा. गुरु वा मार्गदर्शक फक्त मार्ग दाखवतो. त्यावरून प्रबल प्रयत्नाने फक्त तुम्हालाच चालायचे असते. अनेक अनुभव व चमत्कार पाहूनही जर तुम्ही अध्यात्ममार्गात पुढे गेला नाहीत तर कुणीच तुम्हाला पुढे नेऊ शकणार नाही. अर्थात् कधीतरी गुरुमहाराजांद्वारा त्यांच्या शिष्यांत असाधारण परिवर्तन होते व सामान्य मानवालूत तो सिद्ध बनतो; पण असे प्रसंग अपवादात्मक! त्यामुळे परिश्रमाद्वारेच अध्यात्ममार्गात पुढे येण्यासाठी भर दिलेला आहे." असे सांगून ते विश्रांतीसाठी गेले.

सकाळी सूर्योदयालाच मी उठलो. दिनचर्या आटोपून मी सरयुदासजींकडे गेलो; ते अद्यापही आराम करीत होते. मला आश्चर्य वाटले. मी विचार करू लागलो. कदाचित् रात्री उशिरापर्यंत ध्यान-समाधी, भजनादी क्रिया ते करीत असतील म्हणून अजून झोपले आहेत. मी हळू पावलांनी त्यांच्या खोलीबाहेर जाणार इतक्यात् सरयुदासजी हळू आवाजात मला म्हणाले, "रूम बाहेरून बंद करून घ्या; आणि बरोबर अकरा वाजता तुम्ही या; त्याआधी कुणीही मला त्रास देणार नाही, याची दक्षता घ्या."

"हो!" म्हणून मी बाहेर आलो. खोली बाहेरून बंद करून मी माझ्या मेहुणीला तसेच तिच्या मुलांना खोली उघडू नका; व आवाज करू नका असे सांगितले. त्यावेळेस ८ वाजले होते. जवळजवळ साडेअकरा वाजता खोलीची कडी उघडून मी बाहेरून आत येण्याची परवानगी मागितली. त्यांनी मला आत येण्यास सांगितले. आत खोलीत काहीतरी विशेष प्रकारची संवेदनाक्षम चेतना पसरलेली वाटली. सरयुदासजींनी मला बसायला सांगितले; ते गंभीरपणे म्हणाले, "पहा! मी माझ्या आसनावर शवासन करून समाधीस्थ होईन. जेव्हा तुम्हाला खूण करीन, त्याच्याबरोबर १५ मिनिटांनंतर तुम्ही माझ्या नाडीचे व हृदयाचे निरीक्षण लक्षपूर्वक करून घ्या; ते बंद झाले असेल, त्यामुळे तुम्ही अजिबात घाबरून जाऊ नका.

त्यावेळी बाहेर जाऊन फोनजवळ बसा; व माझा फोन येण्याची वाट पहा; तसेच खोली बाहेरून बंद करून घ्या, नाहीतर कुणी आत येईल. मी सुरेंद्रनगरहून तुम्हाला फोन करीन, आणि तुमच्या भावाला तुमच्याबरोबर फोनवर बोलायला लावीन. फोनवर बोलल्यानंतर बरोबर २० मिनिटांनंतर तुम्ही खोलीत या. माझ्या हृदयावर हात ठेवून पहा, माझ्या हृदयाचे ठोके ऐकायला येतील व नाडी चालू झालेली समजेल. त्यानंतर मी आता जसा आहे तसा अवस्थेत येईन.''

त्यांच्या या निर्णयाने माझे सर्व अस्तित्व ढवळून गेले. मात्र आश्चर्य वाटले. परंतु अद्भुत योगक्रियेचा प्रयोग प्रत्यक्ष पहाण्याची ही वेळ असल्याने, मला अत्यंत आनंद होत होता; परंतु केवळ माझ्या समाधानासाठी सरयुदासजी सरळ व सहज भावनेने हा प्रयोग करायला तयार झाले, या विचाराने माझे मन द्रवले, डोळे पाणावले. मी त्यांना हात जोडून विनंती केली, ''आपण मला जी माहिती दिलीत, ती माझ्यासाठी खूप आहे. आपण प्रयोग नाही केलात तरी चालेल. आपल्या सांगण्याने माझे समाधान झाले आहे.'' सरयुदासजी थोडे हसून म्हणाले, ''अध्यात्ममार्ग समजण्यासाठी व आत्मसात करण्यासाठी भीतीचा नेहमी त्याग केला पाहिजे व ईश्वराची अद्भुत लीला समजण्याचा प्रयत्न केला पाहिजे.''

सरयुदासजींचे बोलणे ऐकून मी मानसिकरीत्या तयार झालो. मला त्यांनी स्वस्थ रहायला सांगितले. त्यांनी सर्व वस्त्रे दूर करून फक्त लंगोटी ठेवली. त्यांनी जमिनीवर एक सतरंजी पसरली व त्यावर शवासन करून झोपले. मी त्यांच्याकडे लक्षपूर्वक पहात होतो. त्यांनी शरीराला एकदम हलके सोडले; आणि श्वासोच्छ्वासाची गति हळूहळू वाढवायला सुरुवात केली. एका मिनिटात श्वासोच्छ्वासाचा आवाज जणूकाही व्हॅक्यूम कॉम्प्रेसर जोरात आवाजाने गॅसचे शोषण करतो आहे असा वाटू लागला. हा अनुभव मला नवीनच होता. मला वाटले की, या आवाजाने माझ्या हृदयाचा ठोका चुकला तर प्रयोग राहील बाजूला व मी राहीन दुसरीकडे. दुसऱ्याच मिनिटाला श्वासोच्छ्वासाची गति हळू झाली. त्यावेळेस त्यांनी घड्याळाकडे लक्ष देण्यास सांगून, डोळे बंद केले.

कधी मी घड्याळात पहात होतो तर कधी सरयुदासजींकडे. हा १५ मिनिटांचा कालावधी घालवणे मला असाध्य वाटत होते. १० मिनिटांनंतर सरयुदासजींचे शरीर सहज थोडेसे फुलल्यासारखे वाटले. त्यानंतर त्यांच्या श्वासोच्छ्वासाची क्रिया बंद झाली. हा प्रयोग घरी होत होता, तरी माझ्या मनात भीती होती. बरोबर २० मिनिटांनंतर मी त्यांची नाडी तपासण्यासाठी हात लांबवला. माझ्या हाताला थरकाप सुटला. थरथरत्या हातांनी मी त्यांची नाडी तपासली; ती बंद पडली होती. हृदयाचे ठोके, त्यांच्या छातीवर हात ठेवून पाहिले तर एकदम बंद पडले होते. घड्याळात १५ मिनिटे झाल्यावर मी उठून खोलीच्या बाहेर आलो. खोली काळजीपूर्वक बंद केली. दिवाणखान्यात फोनजवळ जाऊन बसलो.

सरयुदासजींच्या खोलीच्या बाजूलाच दिवाणखाना होतो; त्यामुळे खोलीकडेपण लक्ष ठेवता येत होते. फोनजवळ बसून १५ मिनिटे झाली होती; परंतु फोन काही येत नव्हता. माझ्या मेहुणीने एकदा-दोनदा विचारपूसही केली की, एवढे चिंतातूर कसे दिसता? कुणाचा महत्त्वाचा फोन यावयाचा आहे काय? मी होकारार्थी मान हलवली. मी असहाय्यतेने फोनकडे पहात होतो; इतक्यात् ट्रंककॉलची रिंग वाजली; तो ट्रंककॉल सुरेंद्रनगरहून आला होता. सरयुदासजींनी बोलायला सुरुवात केली, ''ठीक आहात ना?'' मी वरवर ''हो'' म्हणालो. अर्धा मिनिट बोलल्यावर त्यांनी फोन माझ्या भावाकडे दिला. तो म्हणाला, ''सरयुदासजी तुमच्याबरोबर गेले होते, मग परत का आले? आताच ते इथे आले व लगेच मला त्यांनी ट्रंककॉल करण्यास सांगितला; काय भानगड आहे?'' त्याच्या प्रश्नांना मी काय उत्तर देणार? मी त्याला म्हणालो, ''सरयुदासजी तेथून जाण्यासाठी रवाना होतील तेव्हा त्यांना माझ्या खणातील चष्मा दे, मी तो विसरून आलो आहे.'' परत सरयुदासजी फोनवर आले व मला म्हणाले, ''टेलिफोन ठेवल्यानंतर बरोबर २० मिनिटांनी तुम्ही खोली उघडून माझ्याजवळ या आणि तुम्हाला सांगितले त्याप्रमाणे करा.''

टेलिफोन दोन्हीकडे ठेवला गेला. मला त्यावेळेस खूप आनन्द झाला. एकतर मी चिंतामुक्त झालो होतो व माझ्या शंकांचे निवारण झाले होते. २० मिनिटे बोलता बोलता निघून गेली. मी खोली उघडून आत गेलो. सरयुदासजी त्यांच्या आसनावर झोपलेले होते. मी त्यांच्या हृदयावर जेव्हा हात ठेवला तेव्हा त्यांच्या हृदयाचे ठोके सुरू झालेले होते. शरीराच्या उष्णतेत काहीच फरक नव्हता. एका गोष्टीकडे माझे लक्ष गेले. त्यांच्या डाव्या हाताखाली माझा चष्मा पडला होता. मी त्याचक्षणी निर्णय घेतला की, या महात्म्याला सोडायचे नाही व कोणतीही शंका, संशय घ्यावयाचा नाही. सरयुदासजींचा श्वासोच्छ्वास हळूहळू सुरू झाला होता. दोन्ही हातांच्या नाड्या चालू होत्या. त्यांच्याजवळ बसल्यानंतर १० मिनिटांनी ते उठून बसले. त्यांच्या दृष्टीत असा प्रश्न होता की, अजून काही समाधान व्हायचे राहिले आहे काय? मी शरमेने नजर खाली घातली. माझा मनःस्ताप दूर करण्यासाठी ते म्हणाले, ''काही वाईट वाटून घ्यायची आवश्यकता नाही.''

सरयुदासजी उभे राहिले व मला म्हणाले, ''तुमचा चष्मा घ्या. या प्रसंगाची इथे चर्चा करू नका. माझ्या गैरहजेरीत तुम्ही हा प्रसंग तुमच्या नातेवाईकांना सांगितलात तरी चालेल; परंतु आता ह्याचा उल्लेख बिलकुल करू नका.'' मी त्यांना होकार दिला.

दुसऱ्या दिवशी वातावरणात धुके असल्यामुळे घरीच वेळ घालवला. दुपारी आम्ही खूप चर्चा केली. चर्चा करताना ते म्हणाले, ''अजून संपूर्ण परिवर्तन तुमच्यात झालेले नाही.''

''माझे स्नेही 'वज्रनाथ' ज्यांना आम्ही 'बजरनाथ' म्हणतो त्यांच्याजवळ तुम्ही एक-दोन दिवस राहिला की खूप परिवर्तन तुमच्यामध्ये होईल. हे वज्रनाथ तांत्रिक सिद्ध आहेत. सध्या ते हिमालयाच्या पायथ्याशी असणाऱ्या सिद्ध तांत्रिक विद्येचे ज्ञाता व प्राचीन रसविद्येचे प्रखर सूत्रधार व महंत आहेत. त्यांच्याकडून तुम्हाला खूप ज्ञान प्राप्त होईल. सिद्ध असूनसुद्धा ते योगी

लोकांचा खूप चांगला सत्कार करतात. योगी महात्म्यांजवळ ते नेहमी अज्ञानी, सरळ, सेवाभावी बनून रहातात. एका गोष्टीची तुम्हाला सवय करावी लागेल. बजरंनाथ खूप बीभत्स शिव्या देतात. त्यांच्या एका वाक्यात कमीत कमी एक किंवा जास्त शिव्या तर असतातच. अर्थात् हा त्यांचा सहज स्वभाव झालेला आहे; त्यामुळे तुम्हाला वाईट वाटून घ्यायची गरज नाही.''

खूप विचार केल्यानंतर मी निर्णय घेतला की, नेपाळच्या सिद्ध लोकांची भेट घ्यायचीच! व संपूर्ण समाधान प्राप्त करून घ्यायचे; ज्याने मनातील सर्व शंका व तर्क-कुतर्क, विकल्पांना मुक्ती मिळेल.

सरयुदासजी सर्वच चर्चेत मला प्रेमपूर्वक व प्रयत्नपूर्वक समजावण्याचा प्रयत्न करीत; व चर्चा संपल्यानंतर जणू काहीच झाले नाही, असे निर्लेप होत; जसे एखादे सुगंधी फूल काही क्षणांकरिता वातावरणात सुगंध पसरवून गळून पडावे तसे!

**निमित्त**

सरयुदासजींनी दाखविलेल्या अद्भुत योगक्रियेचा प्रयोग पाहिल्यावर दिल्लीतील २-३ दिवसांचे वास्तव्य अर्थपूर्ण वाटले. तिसऱ्या दिवशी संध्याकाळी ४ वाजता आम्ही विमानतळावर गेलो. ५-२० ला नेपाळ रॉयल सर्व्हिसने निघून पाटणा, बनारसला थोडा वेळ थांबून जवळजवळ दीड तासानंतर काठमांडुला पोहचलो. तेथून काठमांडु ७-८ कि.मी. दूर असल्यामुळे टॅक्सी करून गेलो.

सरयुदासजींच्या आखाड्याचे एक साधु रेवादासजी, विष्णुमति नदीकिनारी पशुपतिनाथाच्या मंदिरापासून दूर पर्णकुटीत रहातात; तिथे उतरण्याचा विचार केला. सरयुदासजींनी बाहेरूनच अभिवादन करून आमच्या येण्याची सूचना दिली. आमचा आवाज ऐकून ते लगेच बाहेर आले व त्यांनी आमचे प्रेमभराने स्वागत केले. वयाने ते १८-२० वर्षांचे दिसत होते.

रेवादासजी-सरयुदासजींनी औपचारिक गोष्टी केल्या. सरयुदासजींनी माझा थोडक्यात परिचय करून दिला. रेवादासजींनी एका कमंडलुत थोडे पाणी, तुळशीपत्र, कुठलेसे गवत घालून धूनीच्या प्रज्वलित अग्नीजवळ ठेवले. हा कावा तयार होईपर्यंत सरयुदासजींबरोबर ते बोलत होते. बोलता-बोलता आम्हा दोघांसाठी त्यांनी आसन घालून आराम करण्यास सांगितले.

वातावरणात थंडी खूप होती; ती सहन करणे मला अशक्य होत होते. सरयुदासजी व रेवादासजींना सवय होती. ते फक्त एका गरम शालीने थंडीचे निवारण करीत होते. मी थंडीने कुडकुडत असलेला पाहून रेवादासजींनी विचारले, ''काही चिलिम वगैरे ओढण्याची इच्छा आहे का?'' मी उदास नजरेने सरयुदासजींकडे पाहिले. त्यांनी माझी लाचारी समजून रेवादासजींना चिलिम तयार करण्यास सांगितले. रेवादासजींनी स्वतःच्या झोळीतून स्वतः एकत्र केलेला हथ्थु चरस बाहेर काढून चिलिम बनवली. नेपाळला मोठ्या प्रमाणात साधुलोक ज्या गांजा, चरस, भांग, इत्यादींचे सेवन करतात, त्या वनस्पती यांना कुठेही खरेदी कराव्या लागत नाही. जंगलात कडेकपारीत त्या उगवतात.

साधुलोक गांजेच्या पिकलेल्या झाडावरुन चिकट गोंदेसारखा स्त्राव ओल्या कपड्याने एकत्र करतात; मग हाताने घासून काढून घेऊन, वातीसारखा वळवून घेतात. या पदार्थाला अस्सल 'हत्थुचरस' म्हणतात. कुणी त्याला बत्ती चरसही म्हणतात. हा चरस खूप मादक असतो व शीघ्रतेने तो शरीरात उष्णता निर्माण करतो.

रेवादासजींनी चिलिम तयार करून, पशुपतिनाथाचे नाव घेऊन ओढली व मला दिली. चरस ओढल्याने एकप्रकारची नशा येऊ लागली. मी डोळे मिटून आडवा झालो. सकाळी उठून महामुष्किलीने कपडे धुण्याचे व आंघोळीचे कार्य उरकले. गरम पाण्याची सोय नव्हती. विष्णुमतीच्या तीरावर आंघोळ केल्यावर संकल्प केला की, जितके दिवस इथे राहू, तितके दिवस आंघोळ करायची नाही. सर्वांची दिनचर्या झाल्यावर सरयुदासजींनी माझ्याकडून एक यादी बनवून घेतली व म्हणाले, ''या यादीबरोबर तुम्हाला हव्या असलेल्या वस्तु खरेदी करा. आपण उद्या सकाळी गोडाझीलकडे जाऊ. आज प्रथम आपण पशुपतिनाथाचे दर्शन करा. शिवाय दुसरी स्थळे दुपारपर्यंत पाहून घ्या. दुपारी जेवण झाल्यावर खरेदी करायला जा.'' मी त्यांचे सर्व म्हणणे मान्य केले; व एक अर्थपूर्ण दृष्टीक्षेप त्यांच्याकडे टाकला. त्यांनी माझे मन समजून रेवादासजींना विचारले, ''तुमचा कुणी सेवक किंवा भक्त यांना मार्गदर्शन करेल असा आहे काय?'' त्यावर रेवादासजी म्हणाले, ''एक निवृत्त झालेले मिलिटरी ऑफिसर रोज इथे येतात. आता थोड्याच वेळात ते इथे येतील, त्यांच्याबरोबर पाठवून देईन.'' त्यानंतर त्यांनी मला नेपाळी चलन देऊन सांगितले, ''तुम्ही प्रथम नेपाळच्या बँकेतून चलन बदलून घ्या; म्हणजे व्यवहारात सोईस्कर पडेल.''

थोड्या वेळानंतर एक प्रौढ नेपाळी व्यक्ती रेवादासजींना भेटण्यास पर्णकुटीत गेली; त्यांना घेऊन रेवादासजी बाहेर आले. माझी त्यांच्याशी ओळख करून दिली. त्यांचे नाव होते, 'फूलसिंग'. ते मिलिटरीत नोकरीला होते. त्यामुळे त्यांना हिन्दी भाषा येत होती. आम्ही दोघे सर्वप्रथम पशुपतिनाथांच्या दर्शनासाठी गेलो. पशुपतिनाथ विष्णुमति नदीच्या किनारी विशाल मंदिरातील गर्भगृहात पंचमुखी शिवलिंगरूपाने विराजमान आहेत. शिवाच्या आठ तत्वांपैकी एक प्रधानतत्व म्हणून पशुपतिनाथांना ओळखले जाते.

काठमांडु शहर विष्णुमति आणि वाघमति नदीकाठी वसलेले आहे. वाघमति नदीकाठी मच्छिंद्रनाथांचे देऊळ आहे. ते नेपाळ राज्याचे रक्षक गणले जाते. नेपाळच्या राजाला पशुपतिनाथ मानण्यात येते. महाशिवरात्रीच्या दिवशी राजा एक महत्त्वपूर्ण पूजा आयोजित करतो. त्याची परंपरा खूप वर्षांपासून चालत आली आहे. या पूजेत बसणारा कोणत्याही संप्रदायाचा साधु (आखाडा, गुरुद्वारांतून नियुक्त झालेला) दिगंबर अवस्थेत असतो. जो महात्मा संपूर्ण जितेंद्रीय असेल, शिवस्वरूप असेल त्याची पूजा करण्यात येते. राजाकडून नियुक्त करण्यात आलेली स्त्री या महात्म्यांच्या लिंगाची पूजा करते. हा विधि तेथील परंपरागत शास्त्रोक्त विधिप्रमाणे करण्यात येतो. (या विधिचा उल्लेख करण्याची मनाई असल्यामुळे वर्णन दिलेले नाही.) या पूजेसमयी ज्या साधूची इंद्रिये चलित होतात, त्याला लगेच मृत्युदंड देण्यात येतो. जो यातही निर्विकार राहतो, त्याची शिवस्वरूप मानून राजकुटुंब पूजा करते. या साधूला 'दिगंबरी' नावाचे दुर्लभ बिरूद दिले जाते; व राजकोषातून 'एकमुखी रुद्राक्ष' त्याला

भेट म्हणून देण्यात येतो.

एकमुखी रुद्राक्षाचा महिमा वर्णावा तितका थोडा. संत-सिद्ध लोकांच्या मतानुसार या रुद्राक्षाचा स्पर्श अत्यंत अद्भुत आहे. त्याने शरीरात शांती व आनंदाची अनुभूति होते. आपोआप संपूर्ण अस्तित्व आनंदमय बनते. या रुद्राक्षाचे ओळखण्याचे खरे प्रमाण म्हणजे, या रुद्राक्षाला कोणत्याही प्राणप्रतिष्ठा केलेल्या शिवालयात जाऊन, त्या शिवलिंगाची पूजा-अर्चा करून त्या शिवलिंगावर ठेवाव व त्यानंतर एक बेलपत्र घेऊन,

"नमो रुद्राय नीलाय
नीलकंठाय शांभवे।
अमृतेशाय सर्वाय
महादेवाय ते नमः॥"

असे स्मरण करून,

"त्रिदलं त्रिगुणाकारं
त्रिनेत्रम् त्रियायुधम्।
त्रिजन्मपाप संहारम्
एकबिल्वं शिवार्पणम्॥"

॥ ॐ नमः शिवाय ॥

हा मंत्र म्हणून त्या रुद्राक्षावर ठेवणे. जर एकमुखी रुद्राक्ष खरा असेल तर तो लगेच बेलपत्रावर चढला जाईल. याप्रमाणे १०८ ते १००८ किंवा सव्वालाख बेलपत्र वाहिल्यानंतरही तो रुद्राक्ष खाली दबलेला न रहाता आपोआप वर येतो.

दिगंबर महात्म्यांची पूजा झाल्यावर, त्या महात्म्यांना 'दिगंबरी' वाहिली जाते; म्हणजे ललाटावर तसेच डोळ्याच्या खाली कानापर्यंत भस्मलेपन किंवा चंदन लावले जाते. साधुसमाजात त्या महात्म्यांचा खूप आदरसत्कार केला जातो. असे महात्मा भारतवर्षाच्या संस्कृतीचे आधारस्तंभ मानले जातात.

पशुपतिनाथाच्या मंदिरापासून थोडे दूर एक विशाल गुणेश्वरीदेवीचे देऊळ आहे. नेपाळच्या तीर्थक्षेत्रांत मुक्तिनारायण, जलतापाणी, त्रिशूळधारी, चंगुनारायण, नीलकंठ, सूर्यविनायक, दामोदरकुंड इत्यादी स्थळे आहेत.

मुक्तिनारायण काठमांडुपासून १००-१५० कि.मी. दूर आहे. विमानाने 'पोखरा' येथे जाऊन तिथून पायी ५० कि.मी. जावे लागते. या प्रवासात ४ ते ५ पडाव लागतात. तेथे थोडी फार सोय होते. मुक्तिनारायण हे शालीग्राम क्षेत्र समजले जाते. गंडकी नदीकाठी शालीग्राम मिळतात. त्यांत केव्हातरी सुवर्ण मिळते. भगवान विष्णू तिथे शालीग्राम रूपात विराजले आहेत, असे मानले जाते.

दामोदर कुंडाला गंडकी नदीचे उत्पत्तिस्थान मानले जाते. मुक्तिनारायण-पासून १०-१२ मैल दूर हे कुंड आहे. या कुंडात जो शालीग्राम मिळतो तो साक्षात् विष्णुरूप मानण्यात येतो. त्यावर शंख, चक्र, गदा, पद्म स्पष्टपणे नैसर्गिकरीत्या असते. फूलसिंगबरोबर सबंध दिवस काठमांडु शहर पाहिले. संध्याकाळी सर्व वस्तु खरेदी करून रेवादासजींच्या आश्रमात परत आलो. सरयुदासजींनी फूलसिंगला उद्या सकाळी दोन खेचरे आणायला सांगितले. रेवादासजी स्वतःच्या कार्यात मग्न होते. माझे आसन सरयुदासजींजवळ घातलेले होते. सरयुदासजींनी मला गंभीर स्वरांत सूचना केली, "पहा! उद्याच्या प्रयाणात तुम्ही माझ्या कार्यात निमित्त होणार आहात. तुमचे निमित्त कुठे? कधी? कुठल्यातऱ्हेने आहे ते मला माहीत नाही; पण गुरुमहाराजांचा काही संकेत मला जाणवतो आहे. दुसरे, तुम्हालासुद्धा स्वतःच्या भावी आयुष्यासंबंधी निश्चित निर्णय घेण्याचा अवसर मिळेल. हे कार्य तुम्हाला स्वतःलाच तुमच्या बुद्धिकौशल्याने करायचे आहे. आपण इथून नेपाळची एकेकाळची राजधानी माटगाव इथे जाऊ.

(पृष्ठ क्र. ६७ वर)


श्री साईबाबा संस्थान, शिरडी
विश्वस्त मंडळ

अध्यक्षा
डॉ. लेखा पाठक

श्री. हेमराज शहा
श्री. ब्रिजमोहन भामशा
श्री. शिवराम शिंदे
डॉ. एकनाथ गोंदकर
श्री. भीमाशंकर खांबेकर
श्री. दादासाहेब रोहमारे (पाटील)
श्री. उत्तमराव शेळके
श्री. कारभारी देवकर
श्री. मोतीराम पवार
प्रा. ना. स. फरांदे
श्री. दिलीप अ. शिंदे
श्री. श्रीपतराव जाधव
श्री. मनोहर गोगटे
श्री. पृथ्वीराज रा. आदिक
श्री. राजीव प्र. कुळकर्णी
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. बाबुराव नरोडे (पाटील)
श्री. प्रभाकर बी. बोरावके
ॲड. सोपान धोरडे
श्री. अनंतकुमार पाटील
श्री. प्रशांत व्यं. हिरे
श्री. अण्णासाहेब म्हस्के
श्री. गोपिनाथ ब. कोते (पाटील)
श्री. मोहन मो. जयकर




(पृष्ठ क्र. ६६ वरून)

तेथून खेचर घेऊन मुसाफरी करू. सिद्ध पोखरी सरोवराच्या पश्चिम दिशेला वज्रनाथ महात्म्यांजवळ तुम्हाला रहावयाचे आहे. तुमच्या दोन-तीन दिवसांच्या वास्तव्यानंतर मी तुम्हाला दादागुरुंजवळून परवानगी मागून न्यायला येईन. असा कार्यक्रम आखलेला आहे.''

सरयुदासजींनी सांगितलेल्या कार्यक्रमाने मला खूप आनंद झाला. परंतु 'निमित्त' शब्दाने मला जरा भीती वाटू लागली. मी निमित्त? कुणाचे निमित्त? कशाचे निमित्त? वगैरे विचार मनात येऊ लागले. शेवटी सर्व विचार बाजूला सारून 'आगे आगे गोरख जागे' सूत्रांना मान्य केले. दुसऱ्या दिवशी सकाळी सरयुदासजींनी मला लवकर उठविले. त्यांचा दिनक्रम आटोपला होता. आठ वाजता फूलसिंग दोन खेचरे व दोन गुरखे घेऊन हजर झाला. आमचे सामान त्या गुरख्यांनी खेचरांच्या पाठीवर व्यवस्थित रचले. काही स्वत:च्या पाठीवर घेतले. रेवादासजींनी सरयुदासजींना वंदन करून निरोप दिला. मीपण त्यांना अभिवादन केले. एकाएकी त्यांना काहीतरी आठवले. त्यांनी स्वत:च्या झोळीतून चरसाचे दोन-तीन मोठे गोळे मला दिले व म्हणाले, ''तुम्हाला उपयोगी पडतील.'' मी त्याचा साभार स्वीकार केला; कारण हिमालयाच्या हिमाच्छादित प्रदेशात थंडीपासून बचाव करण्याचे ते एकमात्र साधन होते.

आमची सफर सुरु झाली. सरयुदासजी हिमालयाच्या गोष्टी करू लागले. ते म्हणाले, ''आपण माटगावला जाऊन तिथे असलेल्या सूर्यविनायक गणपतीचे दर्शन करू. हे देऊळ खूप पौराणिक आहे. मंदिरासमोर एक मोठा स्तूप असून त्यावर कमळासारखा आकार बनविला आहे. त्याच्याबाजूला एक मोठी घंटा आहे. हे मंदिर एक सिद्ध मंदिर आहे, जेथून इथले सिद्ध तांत्रिक लोक 'श्री गणेशा' करतात. तंत्रक्रियेसाठी सर्वात प्रथम ह्या गणपतीची उपासना करण्यात येते. त्यामुळे कुठलेही कार्य निर्विघ्नपणे सरळ पार पडते.''

''आपले स्नेही वज्रनाथजींनी माटगावच्या पश्चिमेला असलेल्या 'सिद्ध पोखरी' नावाच्या सरोवराकाठी झाडाखाली १८ महिने एका पायावर उभे राहून तपस्या केली होती व विनायकाची साक्षात् अनुभूति मिळविली होती. सध्या ते या सरोवराच्या ईशान्य दिशेच्या हिमालयात ५ मैल दूर ५४ वर्षेपर्यंत अखंड धूनी चेतन ठेवण्याचा संकल्प करून तपस्या करीत आहेत.''



मी सरयुदासजींना विचारले, ''५४ वर्षेपर्यंत धूनी चेतन ठेवण्यामागे काही खास हेतु आहे की फक्त भजनमग्न राहण्याचा हेतु आहे?'' ते म्हणाले, ''त्यामागे एक खास हेतु आहे. जेव्हा तांत्रिक सिद्ध ठराविक कक्षेपर्यंत पोहोचतो तेव्हा दोन मार्ग फुटतात. ती कक्षा तंत्रसिद्धाच्या पराकाष्ठेची असते. एक मार्ग अनंत ब्रह्मस्वरूपात लीन होण्यास जातो व दुसरा मार्ग प्राप्त केलेल्या अनंत सिद्धिच्या उपयोगाकडे जातो. ह्या अवस्थेत साधकाने निर्णय घ्यावयाचा असतो. जर आत्मतत्वाचा संपूर्ण विस्तार मिळवून मुक्त होण्याचा संकल्प केला तर तो मुक्त होऊ शकतो. जर सिद्ध स्वत:च्या एकत्र केलेल्या शक्तीचा विकास करू इच्छित असेल तर तो शिष्यांद्वारा, सिद्धद्रव्यांद्वारा उपयोग करतो. आता तो उपयोग चांगला किंवा वाईट हे त्याच्या सिद्धिवर आधारित असतो. हे वळण इतके नाजूक असते की, निर्णय घेणे या सिद्धांना कठीण जाते. जेव्हा सिद्ध अशा अवस्थेत असतो, त्यावेळेस दु:ख, भय, व्याधी, पिडा काही रहात नाहीत. शिवाय खुद्द यमराजही त्याला हात लावू शकत नाही. ५४ वर्षानंतर जेव्हा वज्रनाथ आपल्या ५४ वर्षांच्या अग्नीचे आवाहन करतील, तेव्हा ते हिमालयातील असे एक सिद्ध असतील की मृत्यू, वेळ, वायु, अग्नि, पाणी त्यांच्या इच्छेनुसार स्थितीत राहतील. वृजनाथांचे वय जवळजवळ ९८ वर्षांचे आहे आणि अजून ते संपूर्ण स्वस्थ व तंदुरुस्त आहेत. त्यांच्या अखंड धूनीला २२ वर्षे झाली आहेत. त्यांची इष्टदेवी पार्वतीमाता असून सिद्धदेव गणपती आहे. प्रेत, पिशाच्च, वेताळ, भैरव वगैरे त्यांच्या सान्निध्यात राहतात. उच्च कोटीचे १२ प्रेतात्मा सदैव त्यांच्या सेवेला असतात. सूर्यविनायक गणपतीची आज्ञा घेऊन त्यांनी ५४ वर्षे अखंड धूनीच्या तपस्येला सुरुवात केली. त्यामुळे ती पूर्ण झाल्याशिवाय त्यांना काहीसुद्धा होणार नाही.'' मी वज्रनाथजींचा परिचय ऐकून मनाने त्यांच्याजवळ येत होतो.

माटगाव जवळ येत होते. गावाच्या एका बाजूला सूर्यविनायक मंदिराचे जुने पौराणिक शिखर व त्यावरील ध्वजा फडकताना दिसत होती. त्याच्या मागील बाजूस अफाट हिमाच्छादित पर्वत वातावरणात गंभीरता आणत होता. हळूहळू आम्ही गावात प्रवेश करून सूर्यविनायक मंदिराजवळ पोहोचलो. हे देऊळ ५००-६०० वर्षांपूर्वीचे वाटत होते.

(पृष्ठ क्र. ६८ वर)

Registered with the Registrar
of News-papers for India
No. MH/527

(पृष्ठ क्र. ६७ वरून)

विशाल पटांगण व अद्भुत शिल्पांमुळे मंदिर शोभून दिसत होते. मुख्यद्वारावर सूर्याचे चित्र होते. देवळातील सूर्यविनायकाची मूर्ती पौराणिक शिल्पाकृतीने कोरलेली असल्यामुळे प्रभावशाली दिसत होती.

बाजारातून सुकी बोरे व तांदूळ प्रसाद म्हणून आम्ही घेतला. पुजाऱ्याजवळ प्रसाद व दक्षिणा देऊन मी नमस्कार केला. तेवढ्यात 'निमित्त' शब्द मला आठवला. लगेच मी आर्ततेने प्रार्थना केली, "हे गजानना! रक्षण कर!" माझ्या प्रार्थनेच्या प्रत्युत्तरात एक दृश्य पहायला मिळाले; एक सफेद उंदिर आम्ही तिथे ठेवलेल्या आमच्या प्रसादातील तांदुळाचे दाणे खात होता, हे पाहून मला खूप आनन्द झाला. असे वाटले की, जणू विघ्नेश्वराकडून अभयदान मिळाले. गजाननाचे दर्शन घेतल्यावर धर्मशाळेत थोडा आराम केला व तेथून निघालो.

माटगावपासून पश्चिम दिशेला २-३ कि.मी. दूर 'सिद्धपोखरी' इथे जाण्यासाठी गावाचा परिसर सोडून आम्ही पुढे चालू लागलो. आता चढण सुरू झाली होती. सरयुदासजींनी मला खेचरावर स्वार व्हायला सांगितले. मी त्यांना विचारले, "तुम्ही पायीच प्रवास करणार?" ते म्हणाले, "मला नेहमीची सवय आहे; पण तुम्हाला अवघड जाईल. पुढे २-३ मैल बर्फातून चालायचे आहे, त्यावेळेस त्रास होईल." मी त्यांचे म्हणणे मान्य करून खेचरावर स्वार झालो. थंडी तर होतीच. आता सर्व प्रदेश बर्फाच्छादित दिसत होता. दुपारचे ४ वाजले होते. २-३ मैलाचा प्रवास अद्याप बाकी होता. थंड वारा तीक्ष्ण हत्यारासारखा हाडापर्यंत पोहोचून कंप उत्पन्न करीत होता. माझ्याखेरीज सर्वांना या वातावरणाची सवय होती. थंडीमुळे चिंता वाढू लागली. आताच हातापायातील रक्त गोठू लागले होते. मग २-४ दिवस किंवा आठवडा कसा काढायचा?

आम्ही सिद्धपोखरी सरोवराजवळ पोहोचलो. चौफेर बर्फच बर्फ पडले होते. सरोवराचे पाणी बर्फमय झाले होते. सरोवराकाठी एका उंचावर दक्षिणेला जुने शिवालय होते. त्याच्यामागेच आम्हाला जायचे होते. सरयुदासजींनी रेशमी वस्त्रावर फक्त एक गरम शाल ओढली होती. सरयुदासजींच्या चेहऱ्यावर थकवा जरासुद्धा दिसत नव्हता. शिवालयाच्या मागून जाताना, शिवालयाशेजारी एक जीर्ण झालेले, परंतु हिरवेगार असे बेलाचे झाड पाहिले; त्याची एक फांदी तुटलेल्या कळसाला स्पर्श करीत होती. त्या बेलाकडे पाहून मी प्रश्नार्थक मुद्रेने सरयुदासजींकडे पाहिले. त्यांनी बेलवृक्षाकडे पहात मला म्हटले, "या वृक्षाखाली शेकडो वर्षांपूर्वी एका महात्म्याने समाधी घेतली; त्याच्याकडूनच या परिसराचे रक्षण केले जाते."

हिमालय म्हणजे उत्तरखंडाची भूमी. अनेक दिग्पाल व सिद्धमहात्म्यांमुळे हा प्रदेश अद्यापही सुरक्षित आहे. या सुरक्षिततेचा एकच हेतु आहे, तो म्हणजे, सिद्धलोक, सिद्धक्षेत्र, सिद्धद्रव्यें, तसेच सिद्ध वनस्पतींची देखभाल व सुरक्षा करणे, ज्यामुळे ही सिद्धभूमी नेहमी मायाचक्रापासून सुरक्षित राहिली आहे. असे अनेक चमत्कारिक वृक्ष अनादीकाळापासून आपल्या भारतवर्षातील प्रत्येक क्षेत्रात गुप्त व प्रगट रूपात आहेत व जे आजही आपले वैशिष्ट्य सांभाळून आहेत.

काशीपासून ६ कि.मी. दूर 'मधर' नावाचे गाव आहे. तिथे 'कैलास टेकडी' नावाची जागा आहे. तिथे एक 'रामवृक्ष' आहे. त्याची पाने पिंपळासारखी असून त्याच्या प्रत्येक पानावर 'राम' शब्द स्पष्टपणे नैसर्गिकरीत्या लिहिलेला असतो. पानाती[ल] आतील पेशी व रेषांद्वारा 'राम' शब्द स्प[ष्ट] वाचता येतो. इतकेच नव्हे तर त्याच्[या] सालीवर, आतल्या सालीवर प्रत्येक ठिका[णी] 'राम' शब्द लिहिलेला आढळतो. खू[प] दर्शनार्थींना प्रसादरूपाने एक एक पान दि[ले] जाते. संत लोकांचे असे म्हणणे आहे की, जांबुवंताने याच वृक्षाखाली बसून कृष्णावतारापर्यंत रामनामाचा अखंड जप केला होता. त्याचा परिणाम म्हणून सर्व वातावरण राममय झाले होते. त्याचे प्रतीक म्हणून आजही रामवृक्ष अस्तित्वात आहे.

असाच दुसरा वृक्ष दक्षिणेत असलेल्या किष्किंधा (सध्याचे हेपी) इथे पंपा सरोवराजवळ अंजनी पर्वतावर आहे. तिथे रामदली बैरागी साधु फक्कडदास रहातात. या वृक्षापासून थोडे दूर स्वतःची झोपडी बांधून रहातात. या वृक्षाचे नाव आहे 'हनुमानवृक्ष'. त्याच्या प्रत्येक पानावर हनुमान संजीवनीसहित द्रोणाचल पर्वत घेऊन जात असलेले चित्र स्पष्ट दि[सते]. या पानाचा महिमा दक्षिणेत खूप [...] कुठल्याही प्रकारच्या मैलीविद्या (क[...] वगैरेंच्या प्रयोगापासून मुक्ती मिळवण्यास[...] किंवा भूतबाधेपासून मुक्ती मिळवण्यास[...] याचा उपयोग करतात..

(पुढील अंकी)

